मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

अंक ८६ ✦ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✦ जून, २०११

वेबसाईट : www.marathepratishthan.org ✦ ई मेल : maratheparivar@yahoo.co.in

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय



प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना सप्रेम नमस्कार

आपल्या मराठे परिवाराला ज्यांचा अभिमान वाटावा, ज्या कर्तृत्ववान व्यक्तीमुळे आपल्या मराठे कुळाची शोभा वाढली अशा आदरणीय आप्पासाहेब मराठे यांचे दिनांक १९ जून २०११ हे जन्म-शताब्दी वर्ष आहे. त्यानिमित्त आप्पासाहेब यांना अभिवादन!

महाराष्ट्राची राजधानी असलेल्या, उद्योगात अग्रेसर अशा मुंबईसारख्या शहरात 'मराठे उद्योग भवन' या भव्य वास्तूची निर्मिती कै. आप्पासाहेब यांनी केली. ज्या वास्तूत आज मराठे प्रतिष्ठानच्या बैठका भरतात. आप्पासाहेब मराठे मार्ग अशा नावाने तो रस्ता ओळखला जातो. आप्पा-साहेब मराठे यांचे सुपुत्र कै. श्री. सुरेशभाऊ हे मराठे प्रतिष्ठानचे संस्थापक, आधारस्तंभ आहेत. श्रीमती सुलभाताई सुरेश मराठे नेहमी प्रतिष्ठानच्या बैठकींना उपस्थित राहून मार्गदर्शन करीत असतात.

आणखी एक वाईट वाटावी अशी गोष्ट म्हणजे मराठे प्रतिष्ठानचे भीष्मपितामह मराठे घराण्याचा अद्ययावत कुलवृत्तांत करणारे श्री. भाऊसाहेब मराठे यांचे दिनांक २ एप्रिल २०११ला दु:खद निधन झाले. कै. सौ. मालतीबाईंप्रमाणेच भाऊसाहेबांच्या जाण्यानेही मराठे प्रतिष्ठान 'पोरके' झाले. भाऊसाहेबांनी अपार मेहनत घेऊन कुलवृत्तांत तयार केला. त्यासाठी ते प्रत्यक्ष स्वत: घरोघरी गेले आणि अनेक घराण्यांची माहिती मिळविली. स्वत:च्या हस्ताक्षरात त्यांनी ४०,०००च्या वर पोस्ट-कार्डस् लिहून गावोगावी पाठविली. कै. भाऊसाहेबांचा कुलवृत्तांतला पृष्ठ क्रमांक ६९ आहे.

मला स्वत:ला ते अमेरिकेहून दूरध्वनी करून हितगुजविषयीचा आपला अभिप्राय देत. माझे अभिनंदन करीत आणि मराठे प्रतिष्ठानचे काम तुम्ही उभयता चालू ठेवा असा आशीर्वाद देत. कै. श्री. भाऊसाहेब मराठे यांना भावपूर्ण श्रद्धांजली. असो.

या अंकात 'जुन्या बडोद्याच्या माझ्या स्मृती' हा श्री. सदाशिव बळवंत मराठे यांचा बक्षीसपात्र निबंध, 'ड्रीमसिटी' हा संजय अनंत मराठे यांचा ललित लेख, 'माहेरच्या अंगणात' हा सौ. रोहिणी मराठे यांचा लेख, श्री. मोहनराव यांचा 'मुकुंदा' हा मृत्यूलेख वाचून डोळ्यात पाणी आल्यावाचून राहत नाही. डॉ. श्री. अभिजित फडणीस यांची वास्तवदर्शी प्रदीर्घ कविता, वाचकांचा पत्रव्यवहार इत्यादी मजकूराने परिपूर्ण असा हा 'हितगुज'चा अंक आहे.

- आपली शुभचिंतक

**डॉ.सौ.सुमेधा प्र. मराठे,**

**(पृ.१२०)**

८/१३, सहकार नगर, वडाळा,

मुंबई ४०० ०३१

दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९

**२२ मे, २०११**

◉ संपादिका : डॉ.सौ.सुमेधा प्रभाकर मराठे : ८/१३, सहकारनगर, वडाळा (पू.), मुंबई-४०००३१ ◉

दूरध्वनी : २४१५०८८९ ◆ ई-मेल : prabhakar_marathe@yahoo.com

◆ अक्षरजुळणी : सौ. अनघा विवेक मराठे, ठाणे. फोन : ९८३३१११९०२ ◆

# आमची छोटीशी गोष्ट

लेखिका : डॉ. सौ.उज्वला शिरीष चक्रदेव

चार पिढ्यांपूर्वी कदाचित चक्रदेव कोकणातून नागपूरला धंतोलीला श्री. हरी चक्रदेव यांनी २०,०००स्क्वे. फूटची जागा घेतली. ते नागपूरच्या कृषी विद्यापीठामध्ये प्राचार्य होते. १९११ साली ते जेव्हा सेवानिवृत्त झाले, तेव्हा त्यांना मिळालेलं मानपत्र अजून आमच्या घरी आहे. त्या मानपत्रात वापरलेली ब्रिटिश इंग्रजी आणि त्यांचा झालेला गौरव वाचून ऊर भरून येतो.

आमचे आजोबा धोंडो हरी चक्रदेव डी.ए.जी.पी.टी मध्ये कार्यरत होते. उंच, सडसडीत बांधा आणि अत्यंत मृदू भाषिक. माझ्या सासूबाई सांगतात ते प्रत्येकाशी अहोजाहोमध्ये बोलायचे अगदी तान्ह्या बाळाशीसुद्धा. आजी खूप उत्साही आणि सोशल होत्या. बेकींग, कुकींगचे क्लासेस आणि स्पर्धांमध्ये त्यांनी बक्षीसं मिळवली होती. माझ्या यजमानांना तीन काका आणि चार आत्या. या सगळ्यांची मित्रमंडळी (आता वयस्क) जेव्हाही भेटतात त्या वेळेला आमच्या अंगणात मनसोक्त खेळल्याच्या आठवणी काढतात. खूप फळझाडं पण होती तेव्हा आमच्या अंगणात.

माझे सासरे श्री. शांताराम धोंडो चक्रदेव यांनी सिव्हील इंजिनिअरींगमध्ये डिप्लोमा केला होता. ५०-५१ साली थोडे दिवस सिंचन विभागामध्ये नोकरी करून नंतर त्यांनी स्वतःचा बांधकामाचा उद्योग सुरू केला. त्यांच्या कामातील शिस्त आणि कणखर स्वभावासाठी ते प्रसिद्ध होते. कॉन्ट्रॅक्टर असूनदेखील त्यांना सरकारी साहेबांचा लाचखोरपणा आणि कामाकडे होणारे दुर्लक्ष अजिबात मान्य नव्हते. आणि त्यासाठी त्यांनी आयुष्यभर लढा दिला. १९८० साली रस्ता अपघातात दुर्दैवाने त्यांचा मृत्यु झाला. त्याच दिवशी माझे यजमान शिरीष चक्रदेव यांचा फायनल बी.ई.चा निकाल लागला होता. मुलगा इंजिनिअर झाला म्हणून त्यांनी चंद्रपूरच्या सिंचन विभागामध्ये पेढे वाटले आणि ते नागपूरला यायला निघाले होते जेव्हा हा अपघात घडला.

बाकी सगळी स्वप्नं बाजूला सारून शिरीषनी बिझनेसमध्ये उडी घेतली. अनुभव नसल्यामुळे आणि जबाबदारी अचानक आल्यामुळे खूप अडचणींना तोंड द्यावं लागलं. सासूबाईंनी (सुनंदा चक्रदेव) आपले दुःख बाजूला ठेवून आपल्या मुलाला खूप मनापासून आणि समंजसपणे साथ दिली. त्यांच्या पाठिंब्याशिवाय ते दिवस निभावून नेणे खूप कठीण झाले असते. दोन लहान बहिणी आणि एक भाऊ यांचे शिक्षण आणि लग्न व्हायचे होते. जबाबदारी मोठी होती. त्या काळातली एक छोटीशी आठवण शिरीष नेहमी सांगतात. खूप ठिकाणी पैसे अडकलेले होते. देणी आणि घेणी दोन्ही खूप होती. खिशात पैशाची नेहमीच वानवा असायची. चंद्रपूरला रोज हॉटेलमध्येच

*पृष्ठ २३ वर*



# जुन्या बडोद्याच्या माझ्या स्मृती (बक्षिसपात्र निबंध)

श्री. सदाशिव बळवंत मराठे, बडोदे (पृ.३८०)

जुन्या बडोद्याच्या स्मृती लेखनापूर्वी बडोद्याच्या गायकवाड संस्थानातील शिनोर ह्या तालुक्याच्या गावी मराठी शाळेत घेतलेल्या शिक्षणाची आठवण टाळणे अशक्य आहे. फक्त ४-५ विद्यार्थी असताना पण मराठी भाषेत शिक्षण देण्याकरिता एकच शिक्षक दोन-तीन वर्ग घेत असत आणि तरीही शाळेत शिस्त पाळली जात असे. ज्या इयत्तेतून उत्तीर्ण होऊन पहिल्या क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यास वरच्या वर्गाची पुस्तके पुरस्कार म्हणून मिळत असत. बडोद्यात १९३९-४०साली कायम वास्तव्यास आलो व इंग्रजी पहिलीत (हल्लीच्या पाचवीत) दाखला मिळविला. प्राथमिक शिक्षण घेत असताना, हिरक महोत्सव प्रीन्सचा वाढदिवस अशा प्रसंगी विद्यार्थ्यांना मिठाई व कधी कधी शर्टपीसही मिळत असे. प्राथामिक शाळेत सर सयाजीराव गायकवाडांच्या शाळेत असल्याने राजाची स्तुती व आभार दर्शवण्याकरिता वर्ग सुरू व्हायच्या वेळी सरस्वती वंदनानंतर ''ईश ठेवो श्रीमंताश्री सयाजीराव महाराज नृपति पतिं। भाग्यशाली त्या राज्य आम्हा ते सुखकर हो। श्रीपती सदा सुखी असो। सी....सो... सो'' ही प्रार्थना विद्यार्थी आनंदाने म्हणत असत. संस्थानाच्या सहकाराने व आशीर्वादाने हिंदू विजय जिमखान्यात दर वर्षी ८-१० दिवस देशी खेळांचे सामने कलाभूवन मैदानावर आयोजित होत असत. राज्यातील व राज्याबाहेरील खेळाडू व संघ भाग घेण्यास येत असत. शेवटच्या दिवशी राजे किंवा राजपुत्रांच्या हस्ते बक्षीसे मिळविणारास खूप अभिमान वाटत असे - धन्यता वाटत असे. खेळांच्या स्पर्धा चालू असणाऱ्या दिवसांत सर्व शिक्षण संस्था दुपारी १२ ते ३च चालत. तसेच उन्हाळ्याचे दिवसात सरकारी कचेरीचे कामकाज सकाळी ७ ते १२ चालत असे. कचेऱ्यांमधून कर्मचाऱ्यांना लाल बॉर्डरचे हाताचे पंखे देण्यात येत. कचेऱ्यांमध्ये दौतटाकाने लिखाण होत असे. लहान गादी तक्क्यावर बसून समोर उतरते मेज ठेवून कागदपत्रे लिहिली जात. संस्थानाचे स्टेशनरी खातेच सर्व वस्तू देत व खास करून कागदांवर गायकवाड सरकारचे ''जिन घर जिन तख्त'' हे ब्रीदवाक्य अस्पष्ट वाचू शकत असे.

शहरातील सर्व सरकारी इमारतींचे बांधकाम राजे कुठल्या ना कुठल्या देशातून पाहून आलेल्या इमारतींचे अनुकरण करत असत. ते आजही दृष्टीस पडते. सरकारी गणपती, मोहरमचे ताबूत, दसरा ह्यासारखे सर्व उत्सव सरकारी इतमामाने साजरे होत. ह्या स्वाऱ्यांमधून गायकवाडांचे सैन्य, बॉडीगार्ड पथक, सोन्या-चांदीच्या पालख्या, मखमली व चांदीच्या हत्तीवरच्या अंबाऱ्या, चांदीचे रथ ह्यासारखे वैभव पाहून प्रजेचे डोळे दिपून जात, रयत राजाचे कौतुक करीत असे. ह्या स्वाऱ्यांचे दिवशी सारे राजमार्ग पाण्याने धुवून स्वच्छ केले जात. ही कामे करताना कर्मचारी आपल्या राजाकरता धन्यता मानत असत, राजाचे बडोद्याच्या बाहेर जाणे होत असे तेव्हा रेल्वे स्टेशनवर कायम असलेले खास सलून फलटावर आल्यावर त्याचे दरवाजापर्यंत राजाची मोटार जात असे तेही पाहिलेले स्मरते. बी.बी.अँड सी. आय. आयआर-एलवाय च्या नावात दुसरा 'बी' हा बडोद्यासाठी ठेवण्याचा सरकारी हुकूम होता त्याचाही अभिमान वाटे. गणपती उत्सव असो, मोहरमचा ताबूत असो किंवा दसऱ्याची स्वारी असो, हत्तीवर किंवा चार घोड्यांच्या बग्गीत आरूढ झालेल्या राजाचे व राजकुमारांचे प्रजाजन प्रेमाने अभिवादन करीत असत व तितक्याच प्रेमाने राजाकडून हात उंच करून प्रेमाने प्रतिसाद मिळत असे.

स्मृतींचा प्रवास पुढे जात असता सांगावयाचे म्हणजे बडोद्यात शिक्षणक्षेत्रात खूपच उमदा व्यवस्था होती. १९२५ ते १९५० ह्या काळात ज्या काही शिक्षण संस्था होत्या त्यात मुख्यत्वे सरकारी बडोदा हायस्कूल, महाराणी गर्ल्स हायस्कूल, बडोदा एज्युकेशन सोसायटीची एम.सी. हायस्कूल, न्यू इरा हायस्कूल व प्रीन्स हायस्कूल, मॉडेल हायस्कूल वगैरे शाळा होत्या. एम. सी. हायस्कूल सारखी शिस्तपालन करणारी शाळा हल्लीच्या काळात मिळणे कठीण. ह्या शाळेने उत्तमोत्तम विद्यार्थी समाजाला दिले. आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा दरवर्षी होत असत. सर्वच शाळांचे शिक्षक आपल्या विद्यार्थ्याने पुरस्कार मिळवावा म्हणून खूप श्रम घेत असत. महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्यांची संख्या तुरळक होती. महाविद्यालयात क्वचितच मुली प्रवेश घेत या गोष्टीचं त्या काळात अभिमानापेक्षा आश्चर्यच वाटत असे. शाळा-कॉलेजात विद्यार्थी पायी किंवा फारतर दुचाकी (सायकली) वरूनच जात असत. राजघराण्याची मुले मात्र घोडागाडी किंवा लाल रंगाची नंबरप्लेट असलेल्या मोटारगाडीतून येत.

सरकारी दवाखाने असल्याने खाजगी डॉक्टरांच्या पाट्या कमी नजरेस पडत. तसेच वैद्य पण दोन-तीनच होते - हर्डीकर, बाळवैद्य वगैरे. बडोद्यात दवाखान्यातून शस्त्रक्रिया फार पूर्वीपासून म्हणजे १९३५चे आसपासून होत असे. सरकारी दवाखान्यात सिव्हिल सर्जन डॉ. चंद्रचूड, डॉ. कुलश्रेष्ठ वगैरे नावे मुख्यत्वे घेतली जात. कारण ते खूप अनुशासन पाळून निष्णात असे डॉक्टर होते. गायकवाडीत लहानात लहान गावातही वाचनालय, शाळा, पशुदवाखाना, दवाखाने ह्या सोयी उपलब्ध होत्या. त्यासाठी खास आग्रह असे, त्यामुळे शिक्षण, स्वास्थ व पशुसंवर्धन खूप उत्तम चालत असे.

बडोद्यातील प्रजेच्या सुखसोयी व आनंद-प्रमोदाकरिता केलेल्या काही गोष्टी म्हणजे प्राणी संग्रहालय, आजवा सरोवर, खंडेराव मार्केट ह्या व अशा अनेक गोष्टींचा फायदा सर्व प्रजेने घेतला होता. विद्यार्थी अवस्थेपासून नोकरीस लागेपर्यंत बडोद्याच्या सर्वच वातावरणाचा भरपूर आनंद लुटला आहे. सर्व उत्सव साजरे होत, शहराबाहेर अग्गड (मल्लांबरोबर मल्ल, तसेच हत्तींचे व इतरप्राण्याची द्वंद युद्धे पाहण्याचाही आनंद होता. सरकारी इमारतींवर सणावारी-राजकीय उत्सवाचे वेळी काचेच्या पेल्यात तेलवात

करून होणारी रोषणाई व दृश्याचे स्मरण आजही मनाला आनंद देते. तसेच सेंट्रल लायब्ररीतून कुठल्याही विषयाची पुस्तके आणून अभ्यास करणाऱ्या वर्गास व लेखकांना व सर्व प्रांतात आपापली कार्य करणाऱ्यास ह्या वाचनालयात असलेल्या विशाल पुस्तक संग्रहालयाचा फायदा मिळत असे. साहित्य क्षेत्रात होणारे कार्यक्रम, उत्सव ह्यात गायकवाडांतर्फे नेहमी राजघराण्याचा प्रतिनिधी हजेरी देत असे.

श्री प्रतापसिंहराव गायकवाड कोठी कचेरीत राज्यकारभार करण्याकरिता येत असत. त्यावेळी त्यांच्या रस्त्यावरचा बंदोबस्त प्रजेला न नडणारा असे. श्रीमंत प्रतापसिंहराव गायकवाड ह्यांचे निधनानंतर बडोद्याच्या प्रजेने स्वयंभू शोक पाळून त्यांच्या अंतिम यात्रेला हजारोंच्या संख्येत हजर राहणाऱ्या त्या यात्रेचे दृश्य आजही डोळ्यांसमोर येते.

बडोद्यातील टांगे (घोडागाडी), त्याचे पण एक वैशिष्ट्य होत. चारजण आरामात बसून प्रवास करीत. टांग्यात शुभ्र गाद्या व चारी कोपऱ्यात तसेच शुभ्र तकिये असलेल्या, विशिष्ट प्रकारची पायाने वाजणारी मंजूळ आवाज करणारी घंटा व खास म्हणजे गायकवाडांच्या सैन्यातून निवृत्त झालेला, पण तरीही रुबाबदार घोडा जोडलेला असल्याने टांग्याची चालही रुबाबदार वाटे. काही काळाने लहान मोटारी पण आल्या. फक्त दोन आणे देऊन कुठेही 'आडस्ते' म्हणून हात दाखवून मोटारीतून जाता येत असे. सायकलस्वार बरेच असले तरी रस्त्यावरून गर्दी होत नसे. पादचाऱ्यांकरिता फूटपाथ मोठे रूंद असत.

बाहेरगावाहून येणाऱ्या पाहुणे मंडळींना वैशिष्ट्य दाखविण्याकरिता कमाटीबाग, लक्ष्मी-विलास राजवाडा, नजरबाग पॅलेस, मकरपुरा पॅलेस, आजरा सरोवर, सुरसागर व बडोद्यातील सरकारी इमारती ह्या दाखविण्यास खास घेऊन जात असत. रस्त्यावर खूप शांतता असे, पण तरीही तरुण वर्ग फिरण्यापेक्षा आखाड्यातून किंवा इतर खेळतानाच दिसत असे. मात्र प्रेमिकांची फिरावयाची स्थाने अजून एकांतात म्हणजे राजमहाल रोडवरील आनंदबाग (हल्लीचे काशीविश्वनाथ मंदिराचा परिसर) अगर कमाटी-बाग असे. सरकारी अधिकाऱ्यांचे बंगले स्टेशन पलीकडे म्हणजे अलकापुरीत असल्याने तो वर्ग व त्यांची तरुण मुले-मुली रेसकोर्स भागात फिरणे पसंत करीत असत.

जुन्या बडोद्याच्या स्मृतींचा पाढा वाचताना पानांचे व शब्दांचे बंधन पाळणे फार कठीण काम आहे. बालपणापासून तारुण्यात येऊन नोकरी-निमित्त बडोद्याच्या बाहेर पडेपर्यंत कुठल्याही गोष्टीत-प्रसंगात बडोद्याच्या वास्तव्याबरोबर तुलना करून त्याची आठवण येणार नाही असे होणे कठीण कारण बडोद्यात अनुभवलेला प्रत्येक क्षण न क्षण बडोद्याच्या त्या जुन्या वातावरणाच्या श्वासातच अडकलेला आहे. बंदिस्त आहे.

**- श्री. सदाशिव बळवंत मराठे**
'अन्नपूर्णा' शास्त्री पोळ,
कोठीजवळ, रावपुरा, बडोदे - ३९० ००१
दूरध्वनी : २४२३०५५/२४२८६१८

## पुण्य स्मरण



**कै. सौ. सुधा स. मराठे**
**निर्वाण : दि.१२-१-२०११**

***बोट धरूनी शिकविलेस तू, नित्य आम्हा संस्कार नवे***
***सुपुत्र होण्या जीवनात या, नव्या आदर्शाच्या सवे***
***स्नुषा जणू लेकीच तुजला, प्रेमाशीर्वाद सदा पाठीशी***
***कर्तव्याची कास धरावी, शिकवण आम्हा नित्य तुझी***
***नातवंडे ही सदैव स्मरती, तुझ्या मायेच्या साठवणी***
***उबदार तुझ्या त्या कुशीमधल्या, बालपणीच्या आठवणी***
***सर्व दुःखे ही जीवनातली, जाती पळोनी माघारी***
***मिळोनी जेव्हा सारे आम्ही, जातो त्यांना सामोरी***
***तुझ्या आठवणींची शिदोरी, घेऊन आता बरोबरी***
***आयुष्याच्या वाटा जाती, आनंदाच्या मार्गावरी***

***- अंजली***

तुझ्या आशीर्वादासह तुझी स्मृती कधीच न विसरणारे आम्ही :

| | | | | |
|---|---|---|---|---|
| हेमंत | * | राजेंद्र | * | आशुतोष |
| दीपिका | * | दिप्ती | * | अंजली |
| नीरज | * | आदित्य | * | अभिषेक |

**मराठे प्रतिष्ठान संस्थेस खूप खूप शुभेच्छा!**

# ड्रीम-सिटी

**श्री. संजय अनंत मराठे, नाशिक**

मागील महिन्यात मी पुण्याला गेलो होतो. एका चुलत भावाकडे. त्याचे घर एका मोठ्या गृहवसाहतीमध्ये होत. सॉरी! टाऊनशीपमध्ये!

चित्रातल्यासारखे!भव्य! आलिशान! आखीव-रेखीव, सुंदर! क्षणभर वाटले की आपण परदेशात आहोत की काय? चकचकीत रंगांची उधळण इमारतींवर. मोठ्ठे रस्ते, मोठ्ठाली झाडे, मोठ्ठ्या कार, मोठ्ठ्या इमारती, मोठ्ठे प्लॅट्स, मॉल्स! लार्जर दॅन लाईफ!

इमारतीमध्ये शिरलो तर समोर चकचकीत आवाजरहित 'लिफ्टस्'. इमारतीची 'लॉबी' अशी की जणू फाईव्हस्टार हॉटेलच जणू! मंद प्रकाशाचे दिवे, बसण्यासाठी मउशार सोफासेट इ.

एक विशेष लक्षात आले माझ्या की कुठल्याच प्लॅटवर मालकाच्या- रहिवाशाच्या नावाची पाटी, सॉरी नेमप्लेट नव्हती. प्रत्येक फ्लॅट त्याच्या क्रमांकाने ओळखला जातो.

नि:शब्द, गूढ अशी शांतता होती. शेकडो घरे होती पण मनुष्य निवास करत असल्याची कुठलीच जाग नव्हती तिथे.

गप्पा, हास्यविनोदाचे स्वर, खोकण्याचे आवाज, वाद-विवाद, आईचे पोरांवर ओरडणे, लगबग, गोंधळ, फेरीवाल्यांची साद, कामवाल्या बायकांचा कांगावा, मुलांची किलबिल, पक्ष्यांचा चिवचिवाट काही काही नव्हते.

आणि भाऊ मला म्हणाला ह्या एरियाला एवढी डिमांड आहे की सगळे फ्लॅट्स ऑक्यूपाय झालेत.

फ्लॅट उघडून आम्ही आत गेलो. पुन्हा दार लगेच बंद करायचे म्हणे! विरोधाभास सगळा!

आणि दार बंद करून मी मागे वळून माझ्या पूर्वायुष्यात गेलो.

मी वाडा संस्कृतीमध्ये ६-७ वर्षे राहिलेला आणि बाकी सारी वर्षे कॉस्मोपॉलिटन रेल्वे कॉलनीत राहिलेला.

प्रत्येक घरावर मोठ्या पाट्या (आजच्या नेमप्लेटस) असत. उदा. केशव रामदास जोशी, बी.ए., बी.एड. पुणे. गजानन राम पालकर गर्व्ह ऑडिटर इ.

वाड्याच्या चौकात मुले झोपायची रात्री. मग सकाळी नळ आल्यावर आया मुलांना हाक मारायच्या 'अरे कार्ट्यानो उन्हे डोक्यावर आली. उठा मेल्यांनो आत तरी. ए अमित, संजू, मक्या, नित्या, उठा सारे'

तिथे सकाळी जागच यायची मुळी नळावरच्या भांडणांनी. कामवाल्या बायकांच्या गोंधळांनी, भाजीवाल्यांच्या, भंगारवाल्या, फेरीवाल्याच्या सादेनी. ओसरीवरच्या गप्पांनी, वर्तमानपत्रांची देवाण-घेवाण, कुणाकडे काय भाजी केलीय, काय शिजतंय याची विचारपूस, चौकश्या.

आई, मी येतो म्हणत ओरडत जाणारी मुले. वरच्या मजल्यावरचे साठे काका खाली उतरले की वरून साठे काकू ओरडून सांगणार ''आणि हो, येताना अर्धा किलो वांगी आणा सायंकाळी, भरली वांगी करेन म्हणते महेशसाठी.'' (आख्ख्या वाड्याला कळायचे काय बेत आहे साठ्यांकडे)

मध्येच लिमये वहिनींचा स्वर कानी पडायचा, मग ''अग अभिलाषा अंघोळीला पळ आधी, कार्टी एवढी मोठी झाली, पण गती नाही कामाची. कसे होणार हिचे देव जाणे.''

तेवढ्यात पाटणकर वहिनींचा आवाज 'अरे गणेश डबा घेतलास ना शाळेचा आणि आज बाईना काल अडलेले गणित विचार, विसरू नकोस.''

किणीकरांची नवी नवरी, मूकपणे गॅलरीमधून चोरटेपणाने, लाजत टाटा करायची आपल्या नवऱ्याला. आणि डोळ्यांनी सांगायची लवकर ये घरी सांभाळून जा.

मग जोशीकाकांची स्वारी यायची आमच्या-कडे, सकाळी सकाळी. येऊ का वहिनी असे म्हणत थेट स्वयंपाकघरात. चहा नको बरे का म्हणत. अर्धा कप चहा, पेपर घेऊन स्वारी परतायची.

सीन चेंज! बॅक टू ड्रीम सिटी!! पुणे

अरे? काय हे?? कुठे गेले ते आवाज? ती जाग ते आयुष्य? ते सगळे सगळे ??

खरंच कुठली हो खरी 'ड्रीम सिटी' ही का ती?? हे ज्याने त्याने ठरवायचे न???

**- संजय अनंत मराठे**

८, रिंजसी टॉवर्स, शंकरनगर गंगापूर रोड,
चित्रांगण शेजारी, नाशिक - ४२२ ०१३
दूरध्वनी : २३४३७०९

**खापरपणजोबा श्री.शिवराम अंताजी मराठे यांच्या पुण्यस्मरणार्थ यांच्या प्रेमळ स्मृतीस अभिवादन**

सी.ए. प्रभाकर मराठे (पृ.१२०) ८/१३, सहकारनगर, वडाळा, मुंबई ४०० ०३१
सेल : ९८२०२३२०८२ दूरध्वनी : २४१५०८८९ई-मेल : **prabhakar_marathe@yahoo.com**

**चुकीची दुरुस्ती**

अंक ८५ हितगुज-मार्च २०११ पृष्ठ ११वर 'सहवेदना' यामध्ये मराठे प्रतिष्ठानद्वारा कै. श्री. नारायण त्रिंबक मराठे आणि कै. उषा नारायण मराठे, ठाणे यांना भावपूर्ण श्रद्धांजली असे छापायला हवे होते.

चुकीबद्दल क्षमस्व.

# प्रतिष्ठान वृत्त

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शुक्रवारी ४ वाजता कार्यकारी मंडळाची सभा होते. सभेच्या दिवशी कोणीही सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो. (मात्र येण्यापूर्वी कार्यवाहांशी दूरध्वनीवर संपर्क करून यावे म्हणजे सभेची जागा व दिवस यात बदल असल्यास समजेल व गैरसोय टळेल.)

दिनांक १८ फेब्रुवारी २०११ला दुपारी ४ वाजता मराठे प्रतिष्ठानची बैठक मराठे उद्योग भवनात भरली.

सभेला सर्वश्री व्ही. के. मराठे, प्रभाकर मराठे, प्रमोद मराठे, मोहनराव मराठे, श्रीनिवास मराठे, सी. गो. खांबेटे, डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे हे उपस्थित होते.

मागील सभेचे इतिवृत्त वाचले. श्री. मोहनराव मराठे यांनी त्यांच्या दिवंगत भाऊ कै. मुकुंदा मराठे याच्यावर लिहिलेला मृत्यूलेख वाचून दाखवला. श्री. व्ही. के. मराठे यांनी कै. मालतीबाईविषयी लेख लिहिणार असल्याचे सांगितले. श्रीनिवास मराठे यांनी मराठ्यांचा डाटाबेस तयार करण्याची माहिती दिली. त्यांना कुलवृत्तांतावर स्वतंत्र लेख लिहिण्याची सूचना सी. गो. खांबेटे आणि संपादिकेने केली.

✤

मराठे प्रतिष्ठानची बैठक शुक्रवार दिनांक २०मे २०११ला 'मराठे उद्योग भवना'त दुपारी ४ वाजता भरली.

बैठकीला अध्यक्ष श्री. आनंदराव मराठे, सर्वश्री मोहनराव मराठे, व्ही. के. मराठे, सुरेश मराठे (डोंबिवली), हेमंत मराठे, प्रभाकर मराठे, सी. गो. खांबेटे, डॉ. सौ. सुमेधा मराठे, प्रतिष्ठानच्या विश्वस्त श्रीमती सुलभाताई सुरेश-भाऊ मराठे इत्यादी उपस्थित होते. कार्यवाह हेमंत मराठे यांनी मागील सभेचे प्रतिवृत्त वाचून दाखविले. त्याविषयी चर्चा झाली. पत्रव्यवहारापैकी श्री. नंदकुमार मराठे, कोल्हापूर यांनी त्यांच्या घराण्याची माहिती नव्या कुलवृत्तांसाठी पाठविली. श्री. सी. गो. खांबेटे यांना ते पत्र देण्यात आले. (डाटाबेस करणारे श्रीनिवास मराठे यांना ते ती माहिती देतील)

दिनांक १८जून २०११ला मराठे उद्योग-भवनाचे संस्थापक कै. श्री. आप्पासाहेब मराठे यांची जन्मशताब्दी असल्याचे श्रीमती सुलभा-ताईंनी सांगितले. आदरणीय आप्पासाहेबांच्या अनेक हृद्य, चांगल्या आठवणींना त्यांनी उजाळा दिला. माणूस म्हणूनही आप्पासाहेब किती थोर होते, विशाल हृदयाचे होते हे समजले. 'हितगुज'साठी त्यांनी आप्पासाहेबांवर लेख लिहावा अशी संपादिकेने त्यांना विनंती केली. त्यायोगे पुढील पिढ्यांना प्रेरणा आणि मार्गदर्शन होईल आणि आप्पासाहेबांचे कर्तृत्व समजेल. नवीन महत्त्वाची माहिती मिळून ज्ञानात भर पडेल.

अध्यक्षांनी कै. आप्पासाहेब मराठे यांची जन्मशताब्दी एखादा कार्यक्रम घेऊन साजरी करण्याचा मनोदय व्यक्त केला. ज्यांनी मराठे उद्योग भवन बांधले, त्या उद्योग भवन या वास्तूतच ती साजरी करणे योग्य ठरेल, औचित्यपूर्ण ठरेल असे सांगितले. त्याप्रमाणे मीटिंगमध्ये १९जून २०११ला साजरी करण्याचे सर्वानुमते ठरले.

संकष्टी चतुर्थी होती म्हणून सुलभाताईंनी साबुदाण्याची खिचडी करून आणली होती, जोडीला राजगिरा लाडू होते. मस्तपैकी फराळ आणि चहापानानंतर बैठक संपली.

## सौ. सुहासिनी नारायण मराठे यांचे अमृतमहोत्सवी अभिष्टचिंतन!

मराठे परिवाराच्या कुलभगिनी सौ. सुहासिनी नारायण मराठे (पृ.१८), कल्याण यांनी वयाच्या पंच्याहत्तरीत प्रवेश केला. आईच्या अमृतमहोत्सवानिमित्त त्यांच्या दोन्ही विवाहित कन्यांनी सौ. सुनीता रविंद्र केळकर व सौ. स्मिता मधुसूदन बने यांनी पंडितवाडी कार्यालयात संगीत मेजवानी व स्वरूची भोजन असा बेत आखून आईची पंच्याहत्तरी आनंदसोहळा थाटामाटात साजरी केली.

सौ. सुहासिनीताई या उत्तम कवयित्री आहेत. 'हितगुज'च्या अंकात त्यांच्या कविता प्रकाशित झालेल्या आहेत. त्यांच्या काव्यप्रतिभेला अधिकाधिक बहर येवो ही देवी सरस्वतीचरणी प्रार्थना आणि त्यांना निरामय आरोग्यपूर्ण, दीर्घायुष्य लाभो ही सदिच्छा.

जीवेत् शरदः शतम् । या समस्त मराठे परिवाराद्वारा शुभेच्छा!


## नांदा सौख्यभरे

सौ. अपर्णा आणि श्री. अनंत वामन मराठे यांची कनिष्ठ कन्या चि. सौ. कां. केतकी हिचा शुभविवाह चि. अभिजित वामन दामले याजबरोबर शनिवार दिनांक ३१ जुलै २०१०ला सकाळी ९वाजून १५ मिनिटांच्या शुभमुहूर्तावर मनोहर मंगल कार्यालय, पुणे येथे संपन्न झाला.

मराठे प्रतिष्ठानद्वारा वधू-वरांना हार्दिक शुभेच्छा!

# मुकुंदा

**श्री. मोहनराव मराठे, खार (पृष्ठ ३६५)**



***श्री. मोहनराव मराठे, खार यांच्या मोठ्या भावाचे दिनांक ११ जानेवारी २०११ ला डोंबिवलीत निधन झाले. त्याला वाहिलेली श्रद्धांजली***

मुकुंदाचा जन्म २२ फेब्रुवारी १९३३ला बार्शीला झाला. २२ फेब्रुवारी २०११ला त्याला ७८वर्ष पूर्ण होत होते. त्याचे आयुष्य खडतर व चाकोरीबाहेरचे होते. त्याने ते हसत हसत व सर्वांना हसवत काढले. तो रूपाने आम्हा भावंडात सर्वात देखणा होता. त्याचे केस नैसर्गिकरित्या काळेभोर होते व अखेरपर्यंत ते तसे राहिले. स्वच्छता, टापटीप आणि कपडे ह्यामुळे तो उठून दिसायचा. बार्शीला गल्लीत आम्ही पाच भाऊ पाच पांडव म्हणून ओळखले जायचो.

त्याचा प्रश्न ऐकू कमी येण्याचा होता. लहानपणी त्याचा कान फुटला. आई व मोठ्या बहिणी ह्यांनी कान धुवून औषधे घालून खूप प्रयत्न केले, पण उपयोग झाला नाही. पुढे मी पुण्याला डॉ. बी. पी. आपटे (येवल्याच्या आपटेगुरुजींचे चिरंजीव) ह्यांना दाखवले. त्यांनी ऑपरेशन करावे लागेल असे सांगितले. ऑपरेशन यशस्वी झाले नाही तर ऐकू येणे आणखी कमी होईल अशा भीतीने मुकुंदाने माघार घेतली. कमी ऐकू येण्यामुळे अभ्यासात तो मागे पडला. अनेकवेळा कमीपणा घ्यावा लागला. त्याच्या मनात भीतीने घर केले. आम्ही उन्हाळ्याच्या सुट्टीत पोहायला शिकत असताना एके दिवशी (नखातेंच्या) विहिरीचे पाणी वाढले होते - पोहताना कानाला इजा होईल ह्या भीतीने मुकुंदा घरी निघून आला. अगदी अलीकडे त्याने कानामागे बसवण्याचे मशीन घेतले होते. ते ठीक चालले होते, पण कानामागून येऊन तिखट होण्यापूर्वीच मुकुंदाने त्याचा निरोप घेतला.

विनोदी स्वभावाचा मुकुंदा अतिशय समृद्ध आयुष्य जगला. त्याने लिहिलेल्या बार्शीच्या शालेय जीवनातील आठवणी मुळातूनच वाचण्यासारख्या आहेत.

बार्शीला शिक्षण घेऊन मुकुंदा नोकरीसाठी मुंबईला आला. त्याला मुंबईत नोकरी मिळत नव्हती. त्याने मुलुंडला नगरपालिकेत रोजंदारीवर (दररोज २रुपये ३४पैसे) काम केले. पुढे तो महापालिकेत ट्रॅफिक सर्व्हेच्या कामात नियमित झाला, पण सेवा कमी भरली.

पण मुकुंदा हार मानणारा नव्हता. त्याच्याकडे गोड बोलून आपला माल विकण्याचे कौशल्य होते. तो उदबत्या, मिरगुंड, पापड, कॅलेंडर्स, दिवाळीत आकाशकंदिल, फटाके विकायचा. लोकलमधून फटाके नेण्यास बंदी आल्यावर तो व्यापार थांबला. पैसे जमवून तो व्याजाने लावायचा. पगाराचे दिवसात व्याज वसूल करण्यात त्याचा वेळ जायचा. त्याने कुणालाही हातउसने पैसे मागितले नाहीत. उलट तो दुसऱ्यांच्या अडचणीत तत्परतेने हात पुढे करायचा.

बार्शीला आमच्या आत्या माई वैशंपायन आमच्याजवळ राहायच्या. मुकुंदाचा त्यांच्याकडे खूप ओढा होता. त्याची सुरुवात मजेशीर होती. आमचे घरी ज्वारीच्या भाकरी असत. त्या मुकुंदाला आवडत नसत. माईंच्या घरी रोज पोळ्या असत. मुकुंदाचे जेवण पुष्कळदा तिकडेच असे. आमचा आतेभाऊ माधव व तो बरोबरीचे.

मुकुंदाला लहान मुलांची खूप आवड. आमच्या मुला-नातवांना तो आमच्यापेक्षा जास्त समजून घ्यायचा. त्याला आमच्यापेक्षा अधिक समजून घेणारी लहानलहान मुले-मुली त्याच्याशी खेळायला, गोष्टी ऐकायला त्याच्याभोवती चिकटून बसत. त्याने दिलेला छोटासा खाऊ-गोळी त्यांना भावायची. एकदा माझ्या भाचीचा - अलकाचा -मुलगा अनिकेत बाथरूममध्ये अंघोळ करत होता. त्याने आतून कडी लावली होती व अंघोळ झाली तरी तो बाहेर यायला तयार नव्हता. अलकाने त्याला परोपरीने सांगून पाहिले तरी तो बाहेर यायला तयार नव्हता. शेवटी अलकाने मुकुंदमामा आला आहे असे सांगितले तेव्हा तो पटकन दार उघडून बाहेर आला. माझ्या मुलीला - मिनलला काका-काकूंचे खूप वेड होते व आहे.

माझ्या मोठ्या मुलीचा - अनिताचा पहिला वाढदिवस १८ ऑक्टोबर १९६९ रोजी डोंबिवली येथे नव्या फ्लॅटची उदकशांत, सत्यनारायण असा एकत्र साजरा झाला. लगोलग बंगलोरला जायची गडबड होती. मी व स्वाती सामानाची आवराआवर, भांडी घासायची, पुसायची ह्यात व्यग्र होतो. अनिताची अंघोळ राहिली होती. मुकुंदा आला त्याने पाहिले व म्हणाला, "हे भांडे कोण घासणार?" आणि त्याने अनिताला अंघोळ घालून कपडे घालून तयार केले. आमच्या नात्यातील सर्व लहान मुलांची नाळ मुकुंदाला जोडली होती. त्याच्या मुलाला - शिरीषला - मुलगी झाली. अनुजा तिचे नाव. मी आत्तापर्यंत इतरांच्या मुलांना खेळवत आलो. आता मला माझ्या नातीला खेळवायला मिळते आहे ही मुकुंदाची अनुभूति! अनुजात तो व त्याच्यात ती घट्ट गुंतलेले होते. सर्व अडचणींमध्ये अनुजा माझा विरंगुळा आहे असे म्हणायचा. तिच्यासाठी तो कानाला मशीन बसवायला तयार झाला.

परिस्थितीनुसार मुकुंदात व्यवहारीपण उतरले. माणसांची पारख त्याला खूप चांगली, माझ्यापेक्षा शंभरपटीने होती. काकांनी त्याच्याकडून कष्टाची कामे करून घेतली. मुकुंदाला त्यावेळी राग यायचा, पण तो मागे पडेल हे ओळखून काकांनी त्याला कष्टाची कामे करावयाची सवय लावली. पुढील आयुष्यात ही सवय उपयोगी पडली. मुकुंदाच्या पंचाहत्तरीला आम्ही त्याचा सत्कार केला. त्यावेळी त्याने ही कृतज्ञता व्यक्त केली. त्यावेळी त्याच्या डोळ्यांतून घळघळ पाणी वाहत होते.

मुकुंदा दुसऱ्याला कधी दुखवत नसे. उलटसुलट बोलण्याची कला त्याला उत्तम अवगत होती. अलकाने त्याच्यावर केलेल्या कवितेत 'तुम्हाला नको असेल ते मागून घ्या - हवे ते (मात्र) मागू नका' असा उल्लेख आहे. समोरच्या व्यक्तीला तो म्हणायचा, 'मी तुमच्याकडे निमंत्रण द्यायला येणार आहे की आम्ही तुमच्याकडे जेवायला येणार आहोत.' समोरची व्यक्ती भांबावलेली असायची. त्याचा ७५वा वाढदिवस आम्ही साजरा केला. येण्यासाठी त्याने माझ्या मुलीला - मीनलला फोन केला. 'मीनल तू दररोज पहाटे उठतेस. उद्या उशीरा उठ. माझ्या वाढदिवसाला सावकाश ये.' मीनलला तिच्या लाडक्या काकाने असे म्हटल्यावर ती सुखावून गेली.

एखाद्या माणसाच्या परिस्थितीबद्दल विचारले तर मुकुंदा म्हणायचा ता केपीएस आहे म्हणजे खाऊनपिऊन सुखी. स्वत:चाही तोच ब्रँड आहे म्हणायचा.

माझा सर्वांत मोठा भाऊ महाराष्ट्र टाईम्समध्ये होता व मी साखरसंघात. मुकुंदा हे सांगून म्हणायचा मी काय करतो तर महाराष्ट्र टाईम्सच्या कागदात साखरेच्या पुड्या बांधतो. ह्या पुड्या सोडायचेच काम मी ह्या लेखात केले आहे.

अलीकडे हृदयाचा सौम्य झटका आल्यानंतर तो मनाने खचला. कोणत्याही वाहनातून प्रवास करायची त्याला भीती वायायची - फोबियाच झाला होता. माझ्या नातीच्या बारशाला तो डोंबिवलीतून सर्वांबरोबर खारला सुमोतून निघाला. डोंबिवलीबाहेर खिडकाळीला आल्यावर त्याच्या भीतीने उचल खाल्ली व तो तसाच माघारी परतला. मात्र माझ्या सौ. स्वातीचे ऑपरेशन झाल्यावर तो मुलुंडला त्याच्या मुलाला - शिरीषला घेऊन लोकलने आला व पुढील खेपेला एकटा येईन असे आश्वासन देऊन परत गेला.

अलीकडे चिकनगुनियाने त्याला पछाडले. सांधेदुखीने तो बेजार झाला होता. घरात काठी घेऊन चालावे लागायचे. गॅस पेटवण्यासाठी लायटर दाबता येत नसल्याने जळत्या काडीचा आधार घ्यावा लागायचा. मला आता जगायचा कंटाळा आलाय म्हणायचा. सहा महिन्यापूर्वी त्याने सौ. उषावहिनींना आता मी फार दिवसाचा सोबती नाही म्हणून सांगितले होते. रात्री झोप येत नसल्याने गादीवर भिंतीला डोके टेकून बसायचा. मला असेच बरे वाटते म्हणायचा. अशा अवस्थेत ते ११ जानेवारी (माझ्या वडिलांचा मृत्यूदिन) २०११ला समाधिस्त झाला. माझ्या आईवडिलांनी मुकुंदाच्या मांडीवर जगाचा निरोप घेतला. तो स्वत: मात्र कुणालाही न सांगता गेला. सतत सगळीकडे मी ११ नंबरच्या (म्हणजे दोन पायांच्या) बसने फिरतो म्हणणारा मुकुंदा खरोखरच ११-१-२०११ ला अकरा एके अकराच्या बसने गेला.

**- मोहनराव मराठे** (पृष्ठ ३६५)

# 10 THINGS TO EMULATE FROM JAPAN

1. THE CALM : Not a single visual of chest-beating or wild grief. Sorrow itself has been elevated.
2. THE DIGNITY : Disciplined queues for water and groceries. Not a rough word or a crude gesture.
3. THE ABILITY : The incredible architects, for instance. Buildings swayed but didn't fall.
4. THE GRACE : People bought only what they needed for the present, so everybody could get something
5. THE ORDER : No looting in shops. No honking and no overtaking on the roads. Just understanding.
6. THE SACRIFICE : Fifty workers stayed back to pump sea water in the N-reactors. How will they ever be repaid?
7. THE TENDERNESS : Restaurants cut prices. An unguarded ATM is left alone. The strong cared for the weak.
8. THE TRAINING : The old and the children, everyone knew exactly what to do. And they did just that.
9. THE MEDIA : They showed magnificent restraint in the bulletins. No silly reporters. Only calm reportage.
10. THE CONSCIENCE : When the power went off in a store, people put things back on the shelves and left quietly.

**प्रेषक : रमाकांत विद्वांस (पृ. ६२३)**

# माहेरच्या अंगणात

**सौ. रोहिणी मराठे**

माहेर म्हणजे आईवडिलांबरोबर आपले बालपण जिथे गेले ते गाव व तेथील आठवणी. पुढेही लग्न होईपर्यंतच्या आठवणी मनात रेंगाळतात. पण माझे माहेर कोणते? हा प्रश्न मला पडतो. इयत्ता पहिलीपर्यंत मी भुसावळमध्ये होते. नंतर आई नोकरी निमित्ताने कल्याण येथे एका चाळीतल्या एका लहानशाा खोलीत राहात होती. आणि निवृत्तीनंतर पुण्याला राहिली होती. यातील कोणते गाव माझे माहेर म्हणायचं? माहेरचं गाव सांगताना माझी पंचाईत होते. जरी माहेर कोठेही असले आणि लहान असले किंवा माहेरचे घर मोठे असले तरी माहेरच्या आनंदात सुखात फरक पडत नाही. आता 'माहेरी' आई नाही. तिला जाऊन २९ जानेवारी २०११ला एक वर्ष झाले. व मीही आजी झाले तरी माहेराबद्दलचे प्रेम, आस्था कमी होत नाही. आठवणीबरोबर घेऊनच आपण सासरी येतो. आईचे सातवी पर्यंतचे शिक्षण वऱ्हाडात (विदर्भ) झाले. आई वऱ्हाडातील तालुका दर्यापूर येथील अंजनगाव यासारख्या खेड्यात १९२५मध्ये जन्मलेली असूनही सातवी पास झाली होती. त्यावेळी मुलींना जास्त शिकवण्याची पद्धत नव्हती. समाजातील व घरातील लोकांचा विरोधच होता. आजीला मात्र शिक्षणाची आवड होती. ती स्वत: शिकू शकली नाही पण मुलींनी शिकण्याबद्दल तिचा आग्रह होता. त्याप्रमाणे तिने मुलींना शिकवले आपल्या पायावर उभे केले. आई सातवी पास झाल्यानंतर आईचे वऱ्हाडात नात्यातील ओळखीने लग्न झाले आणि भुसावळ येथे संसार सुरू झाला.

वडील रेल्वेत नोकरीला होते. पण पगार बेताचाच होता. म्हणून आईला नोकरी करावी लागणार होती. आजोब गेल्यानंतर आजी पुण्यात स्थायिक झाली त्यामुळे पुण्यात नोकरीसाठी प्रयत्न करण्याचे ठरले. त्यासाठी व्ह. फायनलची परीक्षा द्यावी लागणार होती ती परीक्षा सेवासदन संस्थेमार्फत आईने दिली. नंतर हिंगणे येथील महर्षी कर्वे शिक्षण संस्थेत प्राथमिक शिक्षिकेचा ट्रेनिंग कोर्स केला. फायनल व ट्रेनिंगला आईला चांगले मार्क्स होते. नोकरीसाठी दोन-तीन ठिकाणी अर्ज केले. त्यातील कल्याण येथे नगरपालिकेच्या शाळेत नोकरी मिळाली. आम्ही तिघी बहिणी आहोत. पगार अधिक मिळावा म्हणून आईने नोकरी करत व संसार सांभाळत बाहेरून परीक्षेला बसून मॅट्रीक केले. तेव्हा मुंबई महानगरपालिकेच्या भायखळा येथील शाळेत शिक्षिकेची नोकरी मिळाली आणि पगार वाढला. आम्ही आनंदात होतो पण नियतीने दु:ख दिले. १६ ऑक्टोबर १९७८साली वडिलांचे निधन झाले. आणि आईला दोन्ही भूमिका पार पाडाव्या लागल्या आणि तिने चांगल्या तऱ्हेने पार पाडल्या. आई आमची सर्वस्व झाली. मी इयत्ता दुसरी ते चौथी पर्यंत आजी, मावशी, भाऊ यांच्याकडे राहात होते. त्यावेळी त्यांचा मोठा आधार मिळाला व अजूनही मिळत आहे. मी इयत्ता पाचवी रिमांडहोममध्ये राहून त्यांच्यामार्फत शाळेत जाऊन शिकले. पुढे ६वी ते ११वी पर्यंत हिंगणे महिलाश्रम हायस्कूलमध्ये तेथील वसतीगृहात राहून शिकले. फी अगदी अल्प होती.

माझ्यासाठी होणार खर्च कमी होऊन आईला आर्थिक मदत झाली. योग्यवेळी आर्थिक संपन्न अशा कुटुंबात आईने माझा भाऊ अनंत नारायण गणपुले याच्या मदतीने आम्हा तिघी बहिणींची लग्ने करून दिली. तिचे कष्ट, शिकवण, संस्कार, प्रेम यामुळे आम्ही सुखी समृद्ध व यशस्वी आयुष्य जगत आहोत. आजी, मावशी, भाऊ व त्यांचा परिवार ही माझ्या माहेरात सामावलेला आहे. आईचे व पर्यायाने आमचेही सर्वांशी अजूनही चांगले संबंध आहेत. आईला कष्ट व काटकसर करावी लागली, पण तिने आम्हाला कमी पडू दिले नाही. दुसऱ्यांना देण्यात आनंद वाटत असे. ती म्हणत असे दुसऱ्यांना दिले तर आपले कमी होत नाही तर उलट त्यात वाढच होते. अन्नदान तिला महत्त्वाचे वाटे.

अधिक मासात ३३ मेहुणं जेवायला बोलाविली होती. कार्यालय घेऊन आळंदी येथील वेदविद्या शिकणाऱ्या १०८ बटूंना भोजन व दक्षिणा दिली होती. अशा अनेक आठवणींच्या रूपात ती माझ्याजवळ आहे. तिचा हात देणारा होता. ही आठवण मनात जागवत माझे पती विजय मराठे यांनी पुणे आजारी वृद्धांसाठी असणारी निवारा या संस्थेला देणगी दिली. पारंपरिक वर्षश्राद्ध करण्याऐवजी देणगी रूपाने प्रथम पुण्यतिथी स्मरणार्थ आदरांजली (श्रद्धांजली) वाहिली. तिच्या आत्म्याला शांती मिळो म्हणून देवाजवळ प्रार्थना केली.

**- सौ. रोहिणी मराठे**
११/२ शारदा सेंटर अपार्टमेंट,
फ्लॅट क्र. ४ एरंडवणा, पुणे ४११ ००४
दूरध्वनी : ०२०-२५४४१८०८

**ई-मेलवरील पत्र**

आपला मार्चमधील हितगुज पाहिला. पण पुणे येथे २६-०१-२०११ रोजी झालेल्या वर्धापन दिन कार्यक्रमाचा वृत्तांत वाचला त्यामध्ये जे सत्कार झाले त्याबाबत सविस्त माहिती आली त्याबाबत फोटो काढले आहेत त्यापैकी एखादा फोटो तरी हितगुजमध्ये छापून येणे जरूर होते. पुणे शाखा हितगुजमध्ये फोटो यावेत म्हणून फोटो काढत असते; पण यावेळी फोटो छापला नाही म्हणून सर्व पुणेकर नाराज आहेत याची नोंद घ्यावी.

**- विजय मराठे**

आपण पाठवलेले वर्धापन दिनाचे फोटो अपूर्ण वाटले, त्यातून योग्य फोटो निवडता आला नाही म्हणून ते फोटो मुखपृष्ठावर घेतले नाहीत. क्षमस्व

**- संपादिका**

# संत एकनाथ : थोर समाजसेवक-लोकसेवक-वाङ्मयसेवक

**डॉ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृ.१२०)**

शके १४५४ (इ.स.१५३२) च्या आतबाहेर गोदावरीच्या तीरी मूळ नक्षत्रावर एकनाथ जन्मले. एकनाथांच्या वडिलांचे नाव सूर्यनारायण असून प्रसिद्ध संतश्रेष्ठ भानुदास हे नाथांचे पणजे होत. एकनाथांना लहानपणापासूनच आईबापांचे सुख लाभले नाही. परंतु आजी-आजोबांचे छत्र त्यांच्या डोक्यावर राहिल्यामुळे त्यांचे बालपण सुखा-समाधानात गेले. मात्र एकनाथ अत्यंत बुद्धिमान व जिज्ञासू असल्याने बालपणीच त्यांनी वेदांतज्ञान शिकून घेतले. सातव्यावर्षी त्यांची मुंज झाली. देवधर्म ह्याविषयी प्रेमादर, सत्याची आवड, स्वभावाचा मोकळेपणा, भनजप्रेमामुळे तहान-भूकेचेही विस्मरण, प्रिय भाषण, नम्रता व दुसऱ्यावर उपकार करण्याची वृत्ती हे सद्गुण नाथांच्या ठिकाणी सहज प्रकट झालेले होते, मोराचा पिसारा जसा असतो ना तसे. निराभिमानिता व शांती त्यांच्या अंगी बालपणापासूनच बाणली होती.

नाथांचा विद्याभ्यास पैठणास घरीच झाला, पण त्यांना अध्यात्मज्ञानाची जोड जनार्दन-स्वामींपासून झाली. ते तेराव्यावर्षी देवगडास जाऊन जनार्दन स्वामींच्या संगतीत राहिले कृतार्थ झाले. एकनाथ जीवनभर वारकरी संप्रदायाच्या वातावरणात नांदले, तरी जनार्दन स्वामींकडून प्राप्त झालेला दत्तोपासनेचा वारसाही त्यांनी उत्कटपणे सांभाळला होता. त्यांच्या अनुभूतीच्या क्षेत्रात पांडुरंग आणि दत्तात्रेय यात काहीच भेद नव्हता. गुरुगृहवासाच्या अवधींतील एका अडक्याची चूक शोधून काढण्याकरिता एका रात्री बहुत काळपर्यंत एकनाथ जागत बसले अशी एक गोष्ट असून, दुसरी गोष्ट गुरुजींच्या ऐवजी किल्ल्यावर आलेल्या शत्रुच्या धाडीशी गुरूचा पोशाख आपल्या अंगावर चढवून एकनाथांनी सामना केला व ती धाड पिटाळून लावली अशी आहे. एकनाथांच्या वाङ्मयात पुष्कळदा किल्ल्यावरील यशस्वी चढाईची व रणधुमाळीने होणाऱ्या घातपाताची रुपके इतकी हुबेहूब आलेली आहेत की, जणू काय तो प्रसंग आपल्या डोळ्यांपुढेच घडत आहे असे वाचकांस वाटावे. कदाचित याचे मर्म दुसऱ्या गोष्टीत अंर्तभूत असावेसे वाटते.

नाथांच्या चरित्रात आणि वाङ्मयात त्यांची नि:सीम गुरूभक्ती ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. जनार्दनस्वामींच्या आज्ञेवरून एकनाथांनी गृहस्थाश्रमाचा स्वीकार केला. त्यांची बायको गिरिजाबाई ही आपल्या पतीच्या कार्याशी अत्यंत समरस झालेली, मनमिळाऊ, दयाळू धर्मपत्नी होती. नाथांच्या श्रेष्ठ भूमिकेशी वैचारिक पातळी-वरून ती त्यांच्याशी समरस झालेली होती. नाथांचा मुलगा हरिपंडित हा वेदशास्त्रात पारंगत होता, संस्कृत भाषेचा कर्मठ होता. प्रख्यात कलाकवी मुक्तेश्वर हा एकनाथांचा नातू तर शिवरामस्वामी हा पणतू होय.

ज्याला परमार्थ म्हणतात ते जगाला सोडून केवळ आत्मसुखात रमण्यासाठी नसून तो लोकोद्धारासाठीही आहे अशी एकनाथांची खात्री होती. त्या खात्रीनेच एकनाथांनी आपल्या व्यावहारिक जीवनाला वळण देऊन लोकसेवा केली. त्यांची लोकसेवा समाजातील जातिभेद ओळखत नव्हती; स्त्री-पुरुष या भेदालाही त्यांच्या विचारसरणीत थारा नव्हता. त्यांची समत्वदृष्टी केवळ मनुष्यापुरती आंकुचित, मर्यादित नव्हती तर तिच्या कृपाळू व्यापारातून पशूदेखील सुटले नव्हते.

पितरांच्या श्राद्धप्रसंगी महारांना भोजनास बोलवणे, चुकलेले महाराचे मूल बरोबर घेऊन महारवाड्यात जाऊन त्यास त्याच्या आईकडे पोहोचविणे, तुरुंगातून पळालेल्या गुन्हेगाराला आपल्या घरी ठेवून घेऊन त्याच्या आयुष्याला नवी गती देणे, काशीहून रामेश्वरास चालविलेल्या गंगेच्या कावडतीले पाणी तहानेने तडफडत पडलेल्या गाढवास पाहून 'हाच माझा परमेश्वर' अशा भावनेची कृतार्थता व्यक्त करणे, गणिकेचा उद्धार करणे या साऱ्या कथा एकनाथांच्या श्रेष्ठ चारित्र्याचा परिचय करून देणाऱ्या आहेत.

कीर्तन आणि प्रवचन हे लोकशिक्षणाचे लोकोद्धाराचे महाद्वार आहे. 'ज्ञानदीप लावू जगी' कीर्तन हे माध्यम उत्कृष्ट आहे. लोकांच्या, समाजाच्या जवळ जाण्याचे कीर्तन-प्रवचनासारखे दुसरे साधन नाही. कीर्तनप्रवाचनाद्वारे लोकांशी उत्तमरित्या संवाद साधता येतो आणि म्हणूनच नाथांनी स्वगृही परोपकारार्थ, कीर्तनप्रवचनांची पाणपोई सुरू केली. कीर्तन व नामस्मरण यावर नाथांचे शेकडो अभंग आहेत. संसारात राहून अन्नदान व ज्ञानदान ही दोन महाव्रते नाथांनी जन्मभर निरपेक्ष प्रेमाने पाळली.

एकनाथांनी मराठी साहित्यात एका नव्या युगाला प्रारंभ केला. एकनाथ पूर्वकालीन मराठी साहित्यात प्रारंभी शांतरसालाच अग्रपूजेचा मान मिळाला होता आणि अभंगवाणीत मात्र भक्तिरसाचा उत्कर्ष साधला गेला होता. तेव्हा शांत व भक्ती या दोन रसांनीच नाथपूर्व वाङ्मय व्यापले होते. परंतु एकनाथांनी मराठी वाङ्मयाला जास्त व्यापक स्वरूप दिले. स्फूट व संकीर्ण रचनेप्रमाणेच वीस वीस हजार ओळ्यांचे प्रचंड ग्रंथ देशभाषेत पैदा होऊ लागले. रामचरित्रासारखा अनेक करुणरम्य व स्फूर्तिदायक प्रसंगांनी भरलेला विषय एकनाथांनी निवडल्यामुळे सर्व रसांच्या परिपोषाला भावार्थ रामायणात मुबलक वाव मिळाला. त्यामुळे मराठी काव्याचा एकांगीपणा नष्ट होऊन शृंगार, वीर, करुण, इ. रसांचाही मराठी वाचकांना आस्वाद घेता येऊ लागला. तसेच अध्यात्मपर ग्रंथांकडून कथावाङ्मयाकडे मराठी साहित्यगंगेचा ओघ वळविण्याचे श्रेय एकनाथांनाही द्यावे लागते.

एकनाथांचे दुसरे महत्त्वाचे कार्य म्हणजे त्यांनी मराठी वाङ्मयाला पांडित्याची प्रौढी आणून दिली. यादवकाळ ही मराठीवाङ्मयाची बाल्यावस्थाच होय. त्यावेळच्या भाषासरणीत प्रसन्नता, उत्साह, कोमलता, माधुर्य, उत्कटता, चापल्य इ. गुण आढळतात. एकनाथांच्या काळी

मराठी साहित्यांत ओज, गांभीर्य, विशालता, चातुर्य, विपुलता, वैचित्र्य इ. गुणांचा अंतर्भाव झाला.

एकनाथांचे वाङ्मय म्हणजे पांडित्य आणि प्रेमळपणा, वैदग्ध्य आणि सात्त्विकता, सामर्थ्य आणि सहृदयता यांचा मनोज्ञ संगमच होय. मोठमोठे ग्रंथ लिहिणाऱ्या या भगवद्‌भक्ताने समाजाच्या अगदी तळाशी असणाऱ्या असंस्कृत वर्गाकडेदेखील दुर्लक्ष केले नाही. त्यांच्या गौळणी व भारूडे यांची लोकप्रियता पाहून मन थक्क होते. त्यांनी समाजजीवनाचे बहुविध व संमिश्र स्वरूप ध्यानात घेऊन वाङ्मय लिहिले. त्यामुळे त्यात एकांगीपणा राहिला नाही.

नाथभागवताचा रचनाकाल शके १४९२ ते शके १४९५चा कार्तिक असा साडेतीन वर्षांचा आहे. या ग्रंथाचा काशीक्षेत्री मोठा जयजयकार झाला. नाथांच्या रुक्मिणी स्वयंवराचा रचनाकाल शके १४९३ रामनवमी असून हे दोन्ही ग्रंथ, काशीस 'वाराणसी मुक्तिक्षेत्री। मणिकर्णिका महातीरी' समाप्त झाल्याचे नाथांनी लिहिले आहे. ३०० वर्षांच्या काळात ज्ञानेश्वरीत अनेक अपपाठ शिरले होते तेव्हा नाथांनी संशोधन करून ज्ञानेश्वरीची शुद्ध प्रत तयार केली व ज्ञानेशांच्या समाधीचा जीर्णोद्धार केला. भावार्थ रामायण हा एकनाथांचा शेवटचा ग्रंथ आहे. या ग्रंथाच पहिली पाच कांडे व सहाव्या युद्धकांडाचे ४४अध्याय लिहून झाल्यानंतर नाथांचे प्रयाण झाले. पुढे उरलेला भाग त्यांचा शिष्य गावबा यांनी पूर्ण केला. नाथांनी प्रथमतः चतुःश्लोकी भागवतावर टीका रचिली. ती त्यांच्या गुरूंना आवडली व त्यांनी नाथांना,श्रीमद्‌भागवतावर टीका रचून हे गुह्यज्ञान देशभाषेत सांगण्याची आज्ञा केली.

कीर्तनाच्याद्वारे लोकजागृती करणाऱ्या संतांनी अभंगवृत्तांत कविता रचून लोकांना मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे एकनाथांनीही अनेक अभंग लिहिले असून त्यात पंढरीमाहात्म्य, तीर्थांचे, स्थळांचे, स्थानमहात्म्यपर, तसेच गुरुमहात्म्यपर अभंग, श्रीकृष्ण बाललीला, बाळक्रीडापर अभंग तसेच गौळणी, भारूडे इत्यादी अनेक प्रकारचे लोकसाहित्यसुद्धा त्यांनी निर्माण केलेले आढळते. बहूरूढ, बहुजन समाजात प्रचलित असलेले ते भारूड. बहुजन समाज हा ज्ञानी नव्हता तेव्हा त्यांना समजेल, पटेल अशा भाषेत नाथांनी भारूडे रचली. एखादा विषय (सोपा असला तरी) कठीण करून सांगणे सोपे असते. पण कठीण विषय सोपा करून सांगणे हे काम अवघड असते अे कठीण काम एकनाथांनी भारूडांच्याद्वारे सोपे करून दाखविले. त्यासाठी बहुजनसमाजातील नित्याच्याच जीवनातील, संसारातील, व्यवहारातील दाखले दिले. ज्योतिषी, कोल्हाटी, डोंबारी, भुत्या, गारूडी, वैदू, दरवेशी, फकीर, महारीण, जागल्या, वासुदेव जोशी, बाळसंतोष इ. माणसे तात्कालिन समाजात वावरणारी होती. मरीआई, सखाई देवता प्रचालित होत्या. 'दार उघड बया दार उघड' किंवा 'मोडकेसे घर तुटकेसे छप्पर। देवाला देवघर नाही। मला दादला नको ग बाई।', 'मनुष्य इंगळी अति दारुण। (विंचू चावला) दर आठ दिवसांनी पुरणाची पोळी खाऊन 'बाई मी भोळी ग भोळी' म्हणणारी स्त्री, 'अशी ही थट्टा भल्या भल्याशी लाविला बट्टा', 'जोहार मायबाप जोहार' ही भारूडे आज इतकीवर्षे लोटली तरी कमालीची लोकप्रिय आहेत. भारूडांच्या स्फूटांतून सर्वांभूती परमेश्वर' हे अध्यात्मतत्त्व सुगमतेने सांगितले आहे.

समाजात काय घडते आहे, काय घडू शकते आणि काय घडायला हवे याचे सर्वांगीण चित्र जे साहित्य उभे करते त्याला काळाचे भान आहे असे म्हणता येईल आणि एकनाथांना हे काळाचं भान होतं. समाजातील लोकांची नाडी त्यांनी ओळखली होती आणि समाजातल्या लोकांशी त्यांचा थेट संपर्क होता. पैठणसारख्या कर्मठ क्षेत्रात एकनाथांनी स्त्रीशूद्रांचा कैवार घेतला, भेदभाव मानला नाही, संस्कृत भाषेचा पुरस्कार न करता देशीभाषेचा आवर्जून पुरस्कार केला. हिंदूधर्माला संघटित केले. समाजाला प्रपंचात राहून परमार्थ करता येतो त्यासाठी रानावनात जाण्याची आवश्यकता नसते हे समजावून सांगितले. स्वतः यशस्वी, उत्तम संसार करून दाखविला.

अनाथांचा नाथ संत एकनाथ हे थोर समाजसेवक होते, जसा विचार तसा आचार, उक्ती तशी कृती, आधी केले मग सांगितले असं मूर्तिमंत उदाहरण नाथांनी समाजापुढे ठेवले. नाथांच्या चरित्रांवरून, त्यांच्या वाङ्मयावरून खूप काही शिकण्यासारखे आहे त्यांच्या कृतीतून खूप काही घेण्यासारखे आहे.

वरील लेखासाठी खालील संदर्भग्रंथाचा आधार घेतला आहे.

एकनाथ वाङ्मय आणि कार्य : न. र. फाटक

संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती : गं. बा. सरदार

डॉ. सुमेधा मराठे अप्रकाशित पी.एचडी.पदवी प्रबंध : 'प्राचीन मराठी वाङ्मयातील दत्तोपासना : विवेचनात्मक अभ्यास.

**- डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे**
(संपादिका : हितगुज - मराठे प्रतिष्ठान)
८/१३, सहकार नगर,
वडाळा, मुंबई ४०० ०३१
दूरध्वनी- ०२२-२४१५०८८९

## सांगावसं वाटतंय म्हणून......!

एक प्रसंग, एखादी घटना वा गोष्ट जी प्रत्येकाच्या आयुष्यात घडते... आनंदी, गोड, कटू, चांगली वा वाईट अशी की जी विसरू म्हणता विसरता येत नाही.

तुमच्याही आयुष्यातली अशी घटना, गोष्ट किंवा प्रसंग नक्कीच असेल. जो तुम्हाला इतरांना सांगण्यासारखा वाटेल. ही संधी आम्ही तुम्हाला देतोय. सांगा आपल्या कुलबांधवांना

मग पाहताय काय कागद, पेन उचला, लिहा आणि पाठवा आपल्या हितगुजकडे.

## वाचकांचा पत्रव्यवहार

आपला 'श्रद्धा' हा आठवणींना उजाळा देणारा हा लेख आवडला. त्यात आपण 'बाबूराव' टॅक्सीवाल्याचे व्यक्तिचित्र रंगविले आहे ते फार छान आहे. साधारण ह्या व्यवसायात पांढरपेशा समाजातील लोक दिसत नाहीत. पण चांगली वागणूक, व्यसनापासून दूर राहणे आदी गुणांच्या जोरावर

आपल्या कुटुंबाची आर्थिक व सांस्कृतिक स्थिती त्याने कशी सुधारावी याचे आपण चित्रण केले आहे. व शेवट पण मनाला भावणारा आहे.

ह्या लेखांवरून मला माझे काका कै. गोपाळराव मराठे, कोल्हापूर (पृ.४२८) यांची आठवण झाली. ते विशेष शिकले नाहीत, व प्रायव्हेट मोटार सर्व्हिसमध्ये क्लिनर म्हणून आयुष्याची सुरुवात केली. लक्ष्मी मोटार सर्व्हिस ही 'कोल्हापूर ते बेळगाव' अशी खाजगी बस सर्व्हिस स्वातंत्र्यपूर्व काळात त्यांनी चालविली होती व त्याचे ते मालक झाले. व्यवसायात सचोटी, सौजन्यपूर्ण वागणूक, वाहतुकीची शिस्त पाळणे, नियम न तोडणे या गुणांमुळे त्यांच्या बस सर्व्हिसला नेहमीच लोकांची पसंती असे. ते १९३४ ते १९५० पर्यंत फॅमिली ट्रीप्स कोल्हापूर ते काशी, अलाहाबाद वगैरे ठिकाणी बसने नेत असत. त्यावेळी आजचा सारख्या ट्रॅव्हल कंपन्या नव्हत्या. त्यांच्या दीर्घकालीन ड्रायव्हिंग व्यवसायात एकही अगदी कुत्र्याचाही त्यांच्याकडून अपघात झाला नाही. त्याबद्दल त्यांचा सत्कार झाला होता.

एस.टीने राष्ट्रीयकरण झाल्याने त्यांची बस सर्व्हिस सरकारने नुकसानभरपाई देऊन ताब्यात घेतली. त्यांनी त्या पैशामधून कोल्हापूरला राजारामपूरीत बंगला बांधला व मुलगा चि. विनोद व कन्या मृणालिनी यांना उत्तम शिक्षण दिले. त्यांची पत्नी सौ. रुक्मिणीताई या कोल्हापूरात सामाजिक कार्यकर्त्या म्हणून प्रसिद्ध होत्या. त्यांची खाजगी बस सर्व्हिस एस.टीने घेतल्यावर ते एस.टी इथे नोकरीस राहिले. व सेवानिवृत्त झाले. ते १९७१ मध्ये निधन पावले.

त्यांची कन्या डॉ. सौ. मंजिरी देव, ह्या प्रसिद्ध नृत्यांगना व नृत्यशिक्षिका आहेत. त्यांची ठाण्याला गणेश कला ॲकॅडमी ही नृत्य शिक्षण देणारी संस्था आहे. हजारो मुली त्यांच्या संस्थेमध्ये शिकून गेल्या व देशात व परदेशातही त्या नृत्यवर्ग चालवित आहेत. मंजिरी देव ह्या देशात व परदेशात, लंडन, सिंगापूर, आदि शहरात नृत्याची वर्कशॉप्स घेतात. त्यांनी कथ्थकनृत्य शैलीवर पुस्तके लिहिली आहेत. व नृत्य या विषयावर डॉक्टरेट मिळवली.

त्यांचे यजमान श्री. श्रीराम देव हे इंजिनिअर असून नाट्य व टीव्हीवर कार्यक्रम करतात. त्यांचे चिरंजीव मुकुंदराज देव हे प्रसिद्ध तबलावादक आहेत व ते मोठ्या गायकांसमवेत जगभर व देशात भ्रमंती करतात. दुसरा मुलगा टीव्ही तंत्रज्ञ आहे. या लेखानिमित्त जुन्या व नव्या पिढीमधील मराठे व्यक्तींच्या कार्याचा गौरव करण्याची संधी मिळाली.

**- ग. भा. मराठे (पृ. ४२७)**

✤

मी मराठे नाही. मराठ्यांशी माझा नात्याचा संबंधही नाही. तरीही माझ्याकडे हितगुज येते. ही कृपा, मुलुंड (पूर्व) निवासी, हितगुजच्या प्रारंभीच्या काळातील संपादक व माझे स्नेही लक्ष्मणराव मराठे यांची. आपणही मजकडे हितगुज पाठवता याबद्दल मी आपला आभारी आहे.

हितगुजचे या खेपेचे (अंक८५, मार्च २०११) आपले संपादकीय वाचनीय नव्हे, नव्हे मननीय आहे. साहित्य मनावर काय व कसे संस्कार करते हे सांगणारी आपली सहा वाक्ये मला परिणामकारक वाटली.

सर्व अंक आनंद देणारा आहे. श्रीमती राधा ठाकूर यांचा परिचय, मोहन मराठे यांचे प्रवासवर्णन, कै. डॉ. एकनाथ मराठे यांचा परिचय, वन्समोअर ही गमतदार मांजर कथा. 'मालतीबाई गेल्या' हा मृत्यूलेख, 'संगीत साधक -प्रसारक मराठे' हा लेख... म्हणजे वर लिहिल्याप्रमाणे सर्व अंक मी वाचला.

हितगुजपासून आनंद लुटायचा व कृतज्ञतेने आभाराचे पत्र आळसापोटी लिहायचे नाही हा अव्यवहार मनाला जाचक वाटल्यामुळे हे पत्र कर्तव्य बुद्धीने पाठवत आहे.

ता.क. : रत्नाकर मराठे यांचे प्रकट चिंतन हा कळसच होय.

**- प्रो. भा. ल. महाबळ**

✤

मार्च २०११चा अंक ८५ मार्च ३०ला मिळाला त्याबद्दल अभिनंदन. 'संपादकीय'मध्ये सांगितल्याप्रमाणे विविध विषयांवरील लेख, तसेच कर्तृत्त्वमान मराठ्यांचे गुणगौरवपर माहिती वाचून आनंद झाला.

सोमवार ४ एप्रिल पासून नवीन शक सुरू झाला. श्रीराम, डॉ. आंबेडकर, महावीर यांची जयंती तसेच हनुमान जयंती, गुडफ्रायडे याबरोबर यंदा या चैत्र महिन्याला माझ्यादृष्टीने विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

२८वर्षांच्या प्रयत्नानंतर आपल्या धोनी ब्रिगेडने क्रिकेट वर्ल्डकप जिंकला. पाठोपाठ श्री. अण्णा हजारे यांच्या पाच दिवसांच्या उपोषणामुळे १९६८सालापासून बाजूला पडलेले लोकपाल विधेयक मंजूरीच्या मार्गाला लागले. गेली कित्येक दशके नव्हे शतके कोल्हापूरच्या श्री महालक्ष्मी मंदिरात सर्वसाधारण महिलांना प्रवेशबंदी होती. ती 'दे धक्का' मार्गाने मोडली त्यामुळे मराठे परिवारांतील सर्व स्त्रियांना गाभाऱ्यात प्रवेश सुलभ झाला.

महाराष्ट्रात ५०टक्के महिलांना निवडून येण्याची व राज्य करण्याची-सुधारण्याची संधी प्राप्त झाली. यावरून नवीन वर्ष (शके१९३३) हे गतवर्षापेक्षा आनंदाचे व सुखसमृद्धीचे जाईल असे वाटते. सर्व मराठे परिवाराला हार्दिक शुभेच्छा!

- **चिंतामण त्र्यंबक मराठे (पृ.२४८)**, नवसरगम सोसायटी, बी-२०१, गुस्तार आळी, कळवा, ठाणे

# धाकटी बहीण : रत्ना

**चित्रकार श्री. राजा मराठे**

*विख्यात चित्रकार श्री. राजाभाऊ मराठे यांनी मराठे प्रतिष्ठानच्या 'हितगुज' मासिकाचा लोगो तयार केला. या आधीची हितगुजची मुखपृष्ठे ही त्यांच्या कुंचल्यातून रेखाटली गेली आहेत. हितगुजच्या २५व्या रौप्यमहोत्सवी अंकाचे सुंदर मुखपृष्ठही त्यांनी चितारले होते. त्यांनी आपल्या धाकट्या बहिणीस लिहिलेले पत्र प्रकाशित करत आहोत.*

या विश्वाचा निर्माता परमेश्वर आहे. प्रत्येक गोष्ट त्याच्या इच्छेने घडते. रस्त्यावर पडलेलं साधं टुकार पान त्याच्या इच्छेने इकडून तिकडे हलतं. काळ अनुकूल असेल तर सर्व गोष्टी मनासारख्या होतील नाहीतर कितीही खटाटोप करा...व्यर्थ!

आज पाठांतर स्पर्धेचा दिवस, दीनानाथ नाट्यगृह गच्च भरून गेलेलं, मान्यवर नागरिक तसंच शिक्षणाधिकारी उपस्थित. निवेदिका विद्या देशमुख यांना व्यासपीठावर येण्याचं पाचारण करतात... विनंतीला मान देऊन समर्थांच्या श्लोकांचं पाठगायन होतं आणि टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटात कौतुक केल्यानंतर स्पर्धेचं बक्षीस जाहीर होतं. सातत्याने तीन वर्षं हा बहुमान पटकाविणारी आमची धाकटी बहीण असावी याचा विशेष आनंद वाटला. प्रिय रत्ना, आम्ही या आनंदाच्या क्षणी आमच्या टाळीचा आवाज सामावून देत आहोत. आम्हा सर्वांतर्फे तुझं मन:पूर्वक अभिनंदन!

बालपणी ज्या वयात लहान मुली चुलबोळकं मांडून भातुकलीचा खेळ खेळतात, त्या वयात हाताला चटके घेत चुलीवर भाकरी पिठलं करण्याचा प्रसंग आला. आईची तब्येत नाजूक, त्यामुळे मदतीसाठी तिला तुझ्यावर विसंबून राहावं लागलं. चौथीपर्यंतचं शिक्षण गावच्या शाळेत झालं, परंतु पुढे शिक्षणाची सोय नव्हती. अशाही परिस्थितीत सातवीपर्यंतचा अभ्यास दुसऱ्याच्या मदतीनं तू घरीच पुरा केलास व त्यात चांगलं यश मिळवलंस. त्यावेळी वीज नव्हती त्यामुळे रात्री घरातलं उष्टशेण आटोपल्यावर रॉकेलच्या दिवाटण्यावर अभ्यास करताना तुला आम्ही पाहिली आहे. आज या पार्श्वभूमीवर आमच्या मुलांना, डोक्यापायाखाली उशी सारून डोळ्यासमोर पुस्तक धरल्यानंतरसुद्धा अभ्यासाचे कष्ट वाटतात हे पाहून आश्चर्य वाटतं.

खरं म्हणशील तर लहानपणापासूनच प्रखर इच्छाशक्ती व सातत्याने घेतलेले परिश्रम तुला हे यश संपादन करण्यात कारणीभूत ठरले. तू इंग्रजी शिक्षणासाठी मुंबईस आलीस. आत्तापर्यंत आईच्या हाताच्या आधाराची जागा आता ताई, कमू व विजूने घेतली. तुझं लग्न झालं. परंतु विधिलिखित निराळं होतं. प्रतिकूल परिस्थिती सामोरं जाऊन, जबर परिश्रमांच्या आधारे तू पुन्हा जमिनीवर पाय रोवण्याचा प्रयत्न केलास अन् त्यात यशस्वी झालीस. तुला मनासारखी नोकरी मिळाली. तुझा आत्मविश्वास वाढला. जो व्यवसाय म्हणून पदरी घेतलास त्यात स्वत:ला झोकून दिलंस. घेतलेलं काम जीव ओतून करण्याचा तुझा स्वभाव त्यामुळे ज्या शाळेत तू गेलीस तिथे स्वत:चं असं वर्तुळ तू निर्माण केलंस. शाळेतील मुलं-मुली तुझे बालमित्र झाले, त्यामुळे अडचणीच्या प्रसंगी तुझं मार्गदर्शन अथवा आर्थिक मदत घेताना त्यांना संकोच वाटला नाही. झाडावर उमलणाऱ्या फुलाचा सुगंध स्वत:पुरता न राहता सर्वांचा होतो. तुझं वागणं नेहमी तसं राहिलं.

पाठांतरासाठी घेतलेले २०५ श्लोक म्हणजे तुझ्या भावी आयुष्याकरिता ठेवलेला खजिना आहे. वयोमानाप्रमाणे शरीर नाजूक होत जाईल, परंतु मनाचे हे श्लोक सदैव तुझ्या मनात गुंजन करीत राहतील. या प्रत्येक श्लोकात महात तत्त्वे लपलेली आहेत. प्रयत्नानं त्यातील एखाद्या श्लोकाचं आचरण झालं तर 'आनंद' शोधायला नको. तो तुझ्या सोबतीनंच चालेल. कळावे, सर्वांना सप्रेम नमस्कार,

**आपला अण्णा,**
**१ मार्च १९९६**
**- चित्रकार राजा मराठे**


१४, उद्यम, उद्यमकुंज सोसायटी, राणी सती मार्ग, मालाड (पू.) मुंबई ४०० ०९७
दूरध्वनी : ०२२-२८७७८६३९


## मानसन्मान

आपले कुलबांधव श्री. श्रीकांत नारायण मराठे व सौ. वसुंधरा श्रीकांत मराठे यांचा पुत्र चि. कौस्तुभ श्रीकांत मराठे (५, मदन विलास, रामवाडी, ठाणे येथील रहिवासी) हा माहे एप्रिल-मे २०१०मध्ये रुईया महाविद्यालय, माटुंगा येथून 'सायटो जेनेटिक्स व प्लँट बायोटेक्नोलॉजी' हा विषय घेऊन एम.एस्सी (मुंबई विश्वविद्यालय) ही परीक्षा ६७% गुणांसह उत्तीर्ण झाला आहे.

चि. कौस्तुभ हा उत्तम तबला वादक व गिर्यारोहक आहे. त्याचप्रमाणे फुलपाखरांवर त्याचा विशेष अभ्यास असून डब्ल्यू. डब्ल्यू. एफ वाईल्ड हॉलिडेज, पुकार इ. एनजीओबरोबर त्याने निसर्गवाचन शिबिरे, व्याघ्रगणनेमध्ये भाग घेतला आहे. त्याला पुढील वाटचालीसाठी मराठे परिवारातर्फे शुभेच्छा!

***डॉ. अभिजित फडणीस (मराठे)*** *ह्यांनी सी.ए., आय. सी. डब्ल्यू.ए., सी. एस. सी. एफ. ए. ह्या चारीह पदव्या संपूर्ण देशातून राष्ट्रीय गुणवत्ता यादीत येऊन उत्तीर्ण केल्या आहेत. ह्या परीक्षांमध्ये ते अनुक्रमे ११वे, २रे, १ले व ३रे आलेले आहेत. वयाच्या ४२व्या वर्षी आई. आई. टी. मुंबई येथे पी. एच.डी ला नाव दाखल करून वयाच्या ४८व्या वर्षी त्यांनी नुकतीचही पदवी प्राप्त केली आहे. त्यांचा विषय 'भारतातील राज्यात होणाऱ्या गुंतवणुकीवर परिणाम करणारे घटक' असा होता. प्रबंधाचे तीन भाग होते. पहिल्या भागात कंपन्या गुंतवणूक करताना, स्थळ निवडताना वेगवेगळ्या ४१ निकषांना किती महत्त्व देतात याचे सर्वेक्षण आहे. देशातील अगग्रण्य १००० कंपन्याना पत्रे पाठवून त्यातील २००हून अधिक कंपन्यांकडून आलेल्या उत्तरांचे संकलन आणि त्यांच्या सांखिकिय विश्लेषणातून आलेले निष्कर्ष मांडले आहेत. दुसऱ्या भागामध्ये १४वर्षांच्या काळात सर्व भारतीय राज्यांत झालेल्या गुंतवणुकीबद्दल आणि वर उल्लेखलेल्या ४१ निकषांचे मापन करणारी सांखिकिय माहिती संकलित करून आणि विश्लेषण करून आलेल्या निष्कर्षांची मांडणी दुसऱ्या भागात आहे. तिसऱ्या भागात गुजरात राज्याचा विशेष अभ्यास करून त्यातून इतर राज्यांना काय शिकता येईल याबद्दल माहिती दिलेली आहे. मूळ इंग्रजीतील प्रबंध एका जर्मन शैक्षणिक प्रकाशन गृहाने जगभरात विक्रीसाठी उपलब्ध केला आहे. दोन स्विस बँकांच्या भारतीय उपकंपन्यांच्या संचालक पदांवर तसेच ठाणे जनता सहकारी बँकेच्या संचालकपदीही डॉ. अभिजित यांनी काम केले आहे. सध्या कंपनी अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण व परामर्श देणे हा त्यांचा व्यवसाय आहे. स्टार माझावर तसेच ठाण्याच्या केबलवरून विद्यार्थ्यांना त्यांनी मार्गदर्शन करणारे कार्यक्रम त्यांनी सादर केले आहे. लेख व कविता लिहिणे, क्रिकेट खेळणे, पतंग उडविणे, पोहणे हे जपलेले छंद. वैदिक विचारांच्या प्रचारासाठी परदेशी विचारवंतांच्या भाषण दौऱ्यांचे आयोजन. त्यांचे संकेत स्थळ अभिजितफडणीस.कॉम यावर अधिक माहिती मिळवता येईल.*

# मग का मी करू भ्रष्टाचार?

*हाही करतो, तोही करतो*
*बोकाही उडवतो भूखंडाचे बार,*
*गल्ली ते दिल्ली हाच प्रकार,*
*मग का नको करू मीही भ्रष्टाचार?*

*नोकरी लागायला अडत्यांना माल,*
*बढती मिळायला वरिष्ठांची धमाल,*
*बदलीही मिळायला लाखोंचा भार,*
*मग का नको करू मीही भ्रष्टाचार?*

*प्रवेश मिळायला नोटांची थप्पी,*
*शिक्षण 'महर्षींची' झाली चलती,*
*डॉक्टर झाला की मग रेफरल फार,*
*मग का नको करू मीही भ्रष्टाचार?*

*आता पी. एच. डी. ही स्वस्त झाली,*
*कुठल्या विषयात हवी आहे ती सांगा भली,*
*दहावीच असला तरी बिनतक्रार,*
*मग का नको करू मीही भ्रष्टाचार?*

*गुन्हा करणाऱ्या कोणाला धरावे.*
*की लगेच वरून कोणाचे फोन यावे,*
*तोंड दाबून बुक्क्याचा मार,*
*मग का नको करू मीही भ्रष्टाचार?*

*गल्लीतला दादा करतो नगराची सेवा,*
*सेवा कसली मेला लुटतो मेवा,*
*जेवढी काम जास्ती त्याला येते बहार,*
*मग का नको करू मीही भ्रष्टाचार?*

*नगराची सेवा करताना बोका सोकावतो*
*आणखी मोठे व्हायची स्वप्ने बघतो*
*मतपेट्यांच्या राजकारणावर यांची मदार,*
*मग का नको करू मीही भ्रष्टाचार?*

*बोका हळूहळू गलेलठ्ठ होतो,*
*घुसखोरांना पाठीशी घालतो,*
*देश विकायलाही मागेपुढे नाही बघणार,*
*मग का नको करू मीही भ्रष्टाचार?*

*स्पेक्ट्रम असू दे की कॉमनवेल्थ खेळ*
*आदर्श असो की सरकारी योजनांचा मेळ*
*नेता आणि बाबू मंडळींची नियतच बेकार*
*मग का नको करू मीही भ्रष्टाचार?*

*संरक्षण असो, शेती असो की असो शिक्षण,*
*पैसे ढापयला यांच्या योजना विलक्षण*
*टाळूवरचे लोणी खायला हे नाही बधणार,*
*मग का नको करू मीही भ्रष्टाचार?*

*लोकप्रतिनिधींचे अजबच वर्तन,*
*आमरण प्रवास फुकट आणि पेन्शन*
*तरी प्रश्न विचारायलाही पैसे घेणार,*
*मग का नको करू मीही भ्रष्टाचार?*

*पाचवे कमिशन, सहावे कमिशन*
*किती पगार वाढले विलक्षण*
*काम करायला तरी 'वजनाचा'च आधार*
*मग का नको करू मीही भ्रष्टाचार?*

*सरकार म्हणते भ्रष्टाचार वाईट,*
*लक्ष ठेवायला आहे व्हिजीलंसची मोट,*
*आता त्याच्या साहेबावरच प्रश्नचिन्हांची मोहोर,*
*मग का नको करू मीही भ्रष्टाचार?*

*धंदा सुरू की इन्स्पेक्टर हजार,*
*गिऱ्हाइकाचा मात्र इंतजार,*
*पाकिटांचे दर हे स्वत:च ठरवणार,*
*मग का नको करू मीही भ्रष्टाचार?*

*धंदेवाले ही हुशार झाले,*
*पैसे त्यातूनही कमवायला शिकले,*
*म्हणणार एक पण वस्तू भलतीच देणार,*
*मग का नको करू मीही भ्रष्टाचार?*

*पत्रकारही विकले गेले,*
*बातम्या पेरून त्यांनी इमले केले,*
*त्यावरचाही ते कर चुकवणार,*
*मग का नको करू मीही भ्रष्टाचार?*

*खेळाडूंची ही चलती मोठी,*
*पैसे कमवितात कोट्यानकोटी*
*उंची गाडीवर म्हणे करा माफ आयातकर*
*मग का नको करू मीही भ्रष्टाचार?*

*खासगी क्षेत्रातली ही लोकं हुशार*
*कंपनी बुडते इतरांना कळू नाही देणार*
*त्या आधी हळूच आपले समभाग विकणार,*
*मग का नको करू मीही भ्रष्टाचार?*

कंपनी बुडीत म्हणून कंड्या पिकवतात,
घाबरून धडाधड सगळे समभाग विकतात,
कंपनी प्रगतीपथावर, मग हे सर्वात आधी घेणार,
मग का नको करू मीही भ्रष्टाचार?

महागाईने आणला तोंडाला फेस,
काळ्याबाजाराने ओलांडली वेस,
व्यापाऱ्याची मजा गरीब जीवावर उदार,
मग का नको करू मीही भ्रष्टाचार?

अन्नात भेसळ, औषधात भेसळ,
सावध व्हावा आला डुप्लिकेटचा काळ,
कोणावर विश्वास हा प्रश्नच फार,
मग का नको करू मीही भ्रष्टाचार?

श्रृती सांगतात स्त्रिया देवीचे रूप,
तिला सन्मान द्या तरच मिळेल सुख,
पण ललनेही मांडला सौंदर्याचा बाजार,
मग का नको करू मीही भ्रष्टाचार?

सिनेमा सृष्टी मायानगरी,
सवंग झाली करमणूक सारी,
तडजोड केली तरच पुढे जाणार,
मग का नको करू मीही भ्रष्टाचार?

शिक्षणाचे म्हणे माध्यम दूरदर्शन,
चानेलमधील चढाओढ विलक्षण,
घराघरात कलहांना आमंत्रण देणार,
मग का नको करू मीही भ्रष्टाचार?

निदान साहित्यात सगळ्या सोज्वळ स्वारी,
इथे तरी राहो भ्रष्टाचार दूरी,
वाङ्मय चोरांचे मात्र इथे फावणार,
मग का नको करू मीही भ्रष्टाचार?

मध्यवर्गीय ही झाला बेरकी,
स्वार्थापुरतीच जगण्याला गती,
दीन दुबळ्यांचे दु:ख नाही कोणी पुसणार,
मग का नको करू मीही भ्रष्टाचार?

मध्यमवर्गीय हक्कांचा दावेदार,
भ्रष्टाचारी नेत्याला तो करतो चर्चेत प्रहार,
मग हळूच आपला कर चुकवायला बघणार,
मग का नको करू मीही भ्रष्टाचार?

कोवळ्या मनातही आता विषाचीच पेरणी,
जीवघेण्या स्पर्धेची पायाभरणी,
सहकार कसला, सगळीकडे स्वार्थच दिसणार,
मग का नको करू मीही भ्रष्टाचार?

लोकेषणा, वित्तेषणा, कामेषणांचा बाजार
प्रसिद्धी मिळवायला हापापले फार,
गाढवावर बसायलाही नाही मागेपुढे बघणार
मग का नको करू मीही भ्रष्टाचार?

करणार त्यालाही माहित्येय भ्रष्टाचार वाईट,
स्वर्गात नाही नेता येत यातली एकही वीट,
पैसा आला त्यालाही वाटा फुटणार,
तरी नरकातच जायची का हा इच्छा धरणार?

भ्रष्टाचाऱ्या आठवण ठेव वाल्य कोळ्याची
माया हवी पण पापातल्या सहभागात गोची,
वाल्मिकीची क्षमता तुझी बावनखणी,
मग होतोस का वाल्याच्या पापांचा धनी,

मंडळी हे सगळं का असेच राहणार?
गुंडाराज का असेच फावणार?
गीतेतल्या संदेशाचे काय होणार?
धर्मसंस्थापनेला कधी प्रकटणार?

करूया आपण सगळे निर्णय एक,
भ्रष्टाचाराला तिलांजली थेट,
चारित्र्याची कास धरूया,
ईश्वराला आपल्यातच प्रकट होऊ देऊया

प्रकट होण्याची तो वाट बघतोय,
तप:पूत ऋषींकडून साधना करवतोय,
घनदाट अंधारानंतर प्रसन्न सकाळ,
गाडून टाकूया भ्रष्टाचार

सूर्य, चंद्र वंशीयांचे वारस आपण,
तेजाचे हे अंश सर्वजण,
क्षमता आपल्या प्रकटवूया
जगाला नवे दर्शन घडवूया

भारत देश जगाचा आध्यात्मिक गुरू
अभ्युदय नि:श्रेयसाचा मार्ग धरू,
पुढच्या पिढीला सत्त्व देऊया,
पैसा येईल पण आधी सत्त्व देऊया

व्यासांनी तेव्हा ही हात उंचावलेच होते,
कलियुग येताहे म्हणून बजावले होते,
धर्मातूनच अर्थ काम प्रशस्त होते,
पण हन्त, त्यांचे ऐकून कोण घेते,

त्याचीच झाली परिणती आज,
भ्रष्टाचाराच्या थैमानाचा माज,
पुन्हा धर्माला जागवूया
धर्म म्हणजे पंथ नव्हे समजूया

धर्म म्हणजे माणसाचे जीवनमूल्य
कर्तव्याची सांगड अतूल्य
समाधानाचे खूप मोल
पैशांनी नाही येणार ते तोल

पैसा हवाच पण त्यावर धाक हवा
नीतिमत्तेचा अमोल ठेवा
सुख वस्तूंमध्ये थोडेचे असते?
माणसाच्या मनामनामध्ये ते वसते

विचार करता करता तत्त्व उमगले,
जगण्यासाठी मार्ग सापडले,
आयुष्याचे मी सार्थक करणार,
मग का मी करू भ्रष्टाचार?

**- डॉ. अभिजित फडणीस (मराठे)**

## वाचकांचा पत्रव्यवहार

मला अंक मिळतो व वाचनीय असतो, सूचना देणे सोपे आहे पण अंक प्रसिद्ध करणे यात किती मेहनत आहे हे जावे ज्याच्या वंशातेला कळे. बडोद्याहून काही सेवा हवी असल्यास जरूर कळवा. आपल्याला यश मिळो व तीन महिन्याने प्रसिद्ध होणारा अंक जास्त पानाचा होवो ह्याच सदिच्छेने वाचकाचे मनोगत पूर्ण करतो

**- श्री. मोहन मराठे,**
'समर्थ', शिवापुरा, रावपुरा, बडोदे - ३९० ००१ दूरध्वनी : ०२६५-२४३८०७७/ ९८२५०५५७७१

# श्रद्धा निर्मळ असेल तर संकटातून सोडवते

**श्री. मोहन विष्णुपंत मराठे**

आम्ही बडोद्याचे मराठे तसे मूळचे सावंतवाडीचे त्यामुळे वडील विष्णूकृष्ण मराठे हे टेंबे स्वामींच्या म्हणजेच प. वासुदेवानंदांच्या सान्निध्यात, संपर्कात होते. स्वामींनी त्यांच्या हयातीत प्रत्यक्ष व हयातीनंतर दृष्टांताद्वारे बाबांना म्हणजे वडिलांना मार्गदर्शन केले व त्यामुळेच आम्ही मराठे कुटुंबीय सध्या सुस्थितीत आहोत.

२०-२२वर्षांपूर्वी मराठी वाङ्मय परिषदेच्या संमेलनाध्यक्षाची निवड करण्यासाठी मी म्हणजे मोहन मराठे व चंद्रकांत गवारीकर, मुंबई, बांद्रा येथील साहित्य सहवास येथे गेले होते. तिथून परत गिरगावात बहिणीकडे जाण्यासाठी रात्री नऊ-सव्वानऊ वाजता बांद्रा स्टेशनात चर्नीरोडला जाणारी लोकल पकडण्यासाठी दोन नंबरच्या प्लॅटफॉर्मवर येण्यासाठी रेल्वे रूळ क्रॉस केले व साध्या ड्रेसमधील पोलिसांनी आम्हाला कळेना आम्हाला का धरले, पोलीसांना विचारता ते म्हणाले, रूळ क्रॉस केले, पुलाचा उपयोग केला नाही हा गुन्हा झाला. आम्ही त्यांना विनवणी केली आम्ही बडोद्याचे आहोत व गिरगावात आमची बहीण आमच्यासाठी जेवणाची थांबली आहे. तेव्हा पोलीस म्हणाले, 'सर्वजण अशीच कारणे सांगतात' व आम्हा दोनशे लोकांना बांद्र्याच्या पोलीस चौकीवर नेले. व तिथून कस्टडीत. मी तेव्हा स्वामींचा म्हणजे वासुदेवानंदांचा धावा केला की बहीण जेवायची वाट बघतेय व असा काय गुन्हा केलाय की कस्टडीत ठेवायची वेळ आली. आम्हाला सोडवा कारण त्या काळात भ्रमणध्वनीपण नव्हते संपर्कासाठी व काय आश्चर्य एक इन्स्पेक्टर आला व मला आणि चंद्रकांतला म्हणाला, तुम्ही दोघे घरी जा व आम्हाला जो आनंद झालाय. तो शब्दात सांगता येणार नाही. स्वामींना मनोभावे नमस्कार केला, एवढेच आमच्या हातात होत व तेव्हा वाटले दौप्रदीने कृष्णाचा धावा केल्यावर तोही तिच्या हाकेला धावून आला होता. मी मग तपास केला की बाकीच्या लोकांचे काय करणार तेव्हा कळले उद्या सकाळी कोर्टात नेणार दंड भरून सोडणार तेव्हा आमच्या पायाखालची जमीन सरकली व पुन:श्च स्वामींना नमस्कार करून गिरगावाकडे प्रयाण केले.

**- मोहन मराठे**

'समर्थ', शिवापुरा, रावपुरा, बडोदे - ३९० ००१

दूरध्वनी : ०२६५-२४३८०७७/

९८२५०५५७७१

---

मराठे प्रतिष्ठान, 'हितगुज' अंक ८४वा, डिसेंबर २०१० श्री. चिंतामण महादेव मराठे यांनी हितगुजच्या अंकामध्ये 'माझी जिज्ञासा पुरी व्हावी अशी विनंती केली आहे. याच विनंतीला अनुसरून खालील माहिती देत आहे.

चक्रदेव, जोशी, जाईल, विद्वांस, खांबेटे, रटाटे ही पोटआडनावे केव्हा व का निर्माण झाली असावीत? हे जाणून घेण्याची त्यांची जिज्ञासा आहे.

त्यांच्या या प्रश्नाचे उत्तर श्री. श्रीकृष्ण लक्ष्मण टिळक यांच्या 'चित्पावन दर्शन' या पुस्तकात सापडते.

**१. चक्रदेव :** मराठे कुटुंबातील एकजण यात्रेस गेला होता. परत येताना त्याने चक्रांकित असे पुष्कळ देव आपल्याबरोबर आणले व ते लोकांमध्ये वाटले. त्यावरून लोक त्याला 'चक्रदेव' म्हणू लागले. परिणामत: त्याचे 'मराठे' आडनाव मागे पडले व 'चक्रदेव' हे आडनाव प्रचलित झाले.

**२. जोशी :** मराठे घराण्यातील एका प्रसिद्ध ज्योतिषास व त्याच्या वंशजांना 'जोशी' (कपि गोत्री) नाव प्राप्त झाले.

**३. जाईल :** मराठे घराण्यातील एक पुरुष, भाऊबंदकीच्या त्रासाला कंटाळून आपले मूळगाव सोडून दापोली तालुक्यातील 'दुमदेव' या गावी आला. तिथे गेल्यावर त्याने आपले मूळ आडनाव त्यजून 'जाईल' हे उपनाव धारण केले असे म्हटले जाते.

**४. विद्वांस :** हे संस्कृत विशेषण आहे. विद्वांस म्हणजे विद्वान किंवा पंडित. कपि गोत्री मराठे घराण्यातील विद्वान व्यक्तीवरून हे उपनाव प्राप्त झाले आहे.

**खांबेटे** व **रटाटे** या उपनावाबद्दलची माहिती या पुस्तकात उपलब्ध नाही. वरील माहिती उपलब्ध करून दिल्याबद्दल श्री. श्रीकृष्ण लक्ष्मण टिळक यांना मन:पूर्वक धन्यवाद

त्यांच्या पुस्तकाचे नाव : **'चित्पावन दर्शन'**

संकलन व संपादक : **श्री. श्रीकृष्ण लक्ष्मण टिळक**

प्रकाशक : **चित्पावन ठाणे कट्टा**

**: पुस्तक उपलब्ध होण्यासाठीचे भ्रमणध्वनी :**

१. संतोष जोशी - ९८२००६२१३३, २. हर्षद बर्वे - ९८६९३९९१२६, ३. अतुल भिडे - ९८२१५१५०८३, ४. केदार बेडेकर - ९८२०५०३०५१, ५. देवदत्त गोरे - ९८२१४१७१४६, ६. महेश देवधर - ९८२१३२७६६०

**- सौ. मीना सदानंद मराठे (पृ.४१७)**

# पाठांतर

**श्री. अ. द. मराठे**

एक पूर्णपणे अपरिचित गृहस्थांकडे कामानिमित्त गेलो होतो. ते घरात नव्हते; पण त्यांची वृद्ध आई मात्र घरी होती. तिने घरात बोलावले, जुजबी चौकशा केल्या आणि मी शाळा मास्तर आहे हे कळताच प्रश्न विचारला, ''काय हो, हल्लीच्या मुलांचे पाठांतर असतं का? हल्ली शाळांमधून पाठांतर राहिले आहे का? आमच्यावेळी आमच्या पुस्तकातल्या सगळ्या कविता आमच्या पाठ असत.'' मग तिने वयाच्या सत्तराव्या वर्षीसुद्धा आठवत असलेल्या सर्व कविता म्हणायला सुरुवात केली. आजीबाईच्या सुदैवाने मला त्यातली एकही कविता माहितीची नव्हती. त्यामुळे खरंखोटं करण्याच्या त्रासांतून त्या वाचल्या आणि त्यांचा मुलगा लवकरच आल्याने मीसुद्धा त्यांच्या कवितांपासून वाचलो.

आजीबाईंच्या वयाचा मान ठेवून मी त्यांना प्रश्न विचारले नाहीत. पण त्यांना मी असं विचारलं असतं, ''काय हो आजी, वर्गातल्या एकूण एक मुलांना एकूण एक कविता पाठ असत का?'' आजीबाईंचं उत्तर जर हो असतं तर त्या एकशे एक टक्के खोटं बोलत आहेत हे मी ओळखलं असतं.

पाठांतर या विषयात लोकांचे प्रचंड गैरसमज आहेत. पाठ करणं हा अत्यंत अनैसर्गिक प्रकार आहे. ज्याची स्मरणशक्ती चांगली आहे त्याला पाठांतर करण्याची आवश्यकताच नसते. मात्र स्मरणशक्ती आणि बुद्धिमत्ता याचं प्रमाण सम असतं असं माझं मत आहे. आचार्य अत्रे तर स्मरणशक्ती म्हणजेच बुद्धिमत्ता असे म्हणत. या दोन्ही शक्ती एकरूप आहेत की नाहीत हे मला माहीत नाही. पण यांचे साहचर्य मात्र निर्विवाद आहे.

भारताचे पहिले दोन राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसार आणि डॉ. राधाकृष्णन यांचे एडीसी सी.एल. दत्ता यांनी 'वुईथ टू प्रेसिडेंटस' असे आत्मचरित्र लिहिले आहे. त्यात ते आठवण सांगतात, हे दोघेही सतत वाचन करीत. दोघांनाही फोटोग्राफिक मेमरी लाभली होती. गंमत म्हणून ते एक पान वाचत, पुस्तक दत्त यांच्या हातात देत आणि ते पान पुन्हा जसंच्या तसं म्हणून दाखवत. आणि एवढंच नव्हे तर पुढच्या काळात केव्हाही त्यांना आठवण करून दिली की ते पान पुन्हा जसंच्या तसं म्हणून दाखवत. हा अनुभव दोघांच्याही बाबतीत दत्त यांना आला होता.

दत्त यांच्या बोलण्यावर मी पूर्ण विश्वास ठेवतो. कारण अशी फोटोग्राफिक मेमरी असणारी मुलं-मुली मी शाळेत बघितली आहेत. संस्कृत शिकवणारा असल्याने तोंडी परीक्षेत मी पाठ्यपुस्तकातील नामे आणि धातू यांची रूपे म्हणून घेत असे. केव्हाही कोणत्याही नामाचे किंवा धातूचे रूप म्हणायला सांगा, तात्काळ हात वर करणारी मुले स्कॉलरच असत. (आणि असतात.) या उलट काही मुलं मुली अशी असत की म्हणताना चुकत, अडखळत, विसरत आणि गयावया करीत सांगत, ''सर, काल घरी पाठ केली तेव्हा बरोबर जमली. आताच विसरायला होतंय.'' मी अशा मुलांना कधीही शून्य मार्क दिले नाहीत.

मला एकाने विचारले, ''काय हो, भटजींचे शेकडो मंत्र कसे काय पाठ होतात? ते काय विद्वान असतात?''

माझं उत्तर अशा प्रश्नांना असं आहे, सगळ्या ब्राह्मणांचे शेकडो मंत्र पाठ असतात हे गृहीतकच मूळात चूक आहे. मध्यम बुद्धीच्या ब्राह्मणांना त्यांच्या उपयोगापुरते आणि उपयोगात आणत असल्यामुळे मंत्र व्यवस्थित येतात. पण त्यांच्यातही काही धोंडभट असतताच. त्याचीही उपजीविका चालावी अशा दयाबुद्धीने त्यांना सामूहिक पठणात सामावून घेतात आणि तेही अर्धेमुर्धे आठवेल ते आवाजात आवाज मिसळत, विशेषत: शेवटच्या विसर्गोच्चारांत हा हा करीत वेळ मारून नेतात. अशा भटजींना हा हा भट असे नाव आहे. एरवी त्यांना पाण्याच्या घागरी भरून अभिषेकपात्रा ओतायचे काम फक्त देतात. दुसरं असं की भटजी काय म्हणत आहेत हे हातात पुस्तक घेऊन कोण बघतो?

नट, गायक, वादक आणि अशीच विविध क्षेत्रात माणसे असतात की ज्यांना पाठांतर आवश्यक असते. पण इथेही उत्तम, मध्यम भेद आहेतच. मध्यम प्रॉमटिंगवर भागवतात आणि पुढच्या पायरीतले ''महाराज, महाराज सगळे गड मावळ्यांवर चढले'' अशी बातमी घेऊन येतात.

ठाण्याला एका वर्षी संस्कृत दिनाचा कार्यक्रम होता. त्यात बाजूच्या परिसरातील २० आदिवासी मुलांनी एक सुरात उपनिषदांचे पठण केले. मला त्यांचे गुरुजी व ती मुले यांचे कौतुक वाटले; पण आदिवासी असूनही पाठांतर किती छान करतात हे इतरांनी केलेले आश्चर्य मला साफ अमान्य आहे. पाठांतर व उच्चारण या गोष्टी जातींवर अवलंबून नाहीत. माझ्या माहितीचे एक ब्राह्मण गृहस्थ आहेत ते नियमाने स्तोत्र पठण करतात. मात्र त्यांचं पठण मला ऐकवत नाही इतके भीषण असते. मी त्यांना उच्चार शिकविण्याचा व त्यांनी ते शिकण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला; पण आम्ही दोघेही अपयशी ठरलो. कारण एकच प्रत्येकाला मिळणाऱ्या स्वरयंत्राची ठेवण वेगवेगळी असते. ती आपण मान्य करावी. त्यावरून कोणाला हीन लेखू नये.

पाठांतराची आवृत्ती नियमित होत नसेल तर पाठ केले विस्मरणात जाते. अपवाद फक्त राजेंद्रप्रसाद, राधाकृष्णन यांचेच! माझ्या मुलींकडून मी कधीही काहीही पाठ करून घेतले नाही आणि त्यांनीही कधी केले नाही. मात्र त्या दोघींनाही त्यांच्या क्षेत्रातील काहीही विचारा, अचूक आणि सविस्तर उत्तर तयार असते.

**- श्री. अ. द. मराठे**

१० शांतिनाथ अपार्टमेंट, १६८ यशवंत नगर,
तळेगाव दाभाडे, जि. पुणे ४१०५०७

# निर्भेळ

**कै. विनायक दत्तात्रय मराठे**

राजापूरला आमचे भाड्याने घर होते तरी घरी कायम म्हैस होती. त्याकाळी भाडेकरूला म्हैस ठेवण्याची व तिच्या गवतपाण्याची सोय असे.

वडिलांनी बिऱ्हाड केल्यावर पहिली म्हैस घेतली तिचं नाव कोयना. भरपूर दूध देणारी व गुणी म्हैस होती ती! शेवटच्या वेतापर्यंत ती आमच्या गोठ्यात होती. गाभण राहून दूध देईना झाली की एक शेतकरी तिला पोसणीला न्यायचा. मोबदला म्हणून वेताआडचे जावपे (रेडा वा रेडी जे असेल ते) त्याला द्यायचे. ''काका, ही म्हातारी झाली की विकू नका, मी नेईन.''

म्हातारी झाल्यावर वडिलांनी जड मनाने, डोळ्यांत टिपे आणून त्याला देऊन टाकली. त्याचेकडे तिची दोन वेते झाली व एक दिवस तोही डोळ्यांत टिपे आणून ती गेल्याचे सांगत आला. नंतर किती वेळ तिचे गुणवर्णन करीत होता. होतीच ती तशी मंगळाई. वडीलही तिचे सर्व मनापासून करीत व तीही भरपूर दूध व प्रेम देई. सकाळी शाळेत जातान वडील तिच्या पुढ्यता प्रेमाने गवताची कवळी टाकून जात.

संध्याकाळी तिच्या नजरेआड असतानाही वडिलांनी बेड्याची काठी काढल्याचा आवाज आला की ती व्हॅक करून स्वागत करायची व ते कपडे बदलून तिच्यासमोर जाऊन पाण्याची बादली ठेवीपर्यंत व गव्हाणीत गवताची कवळी टाकीपर्यंत तिचे व्हॅक व्हॅक चालू असायचे. नंतर वडील हात पाय धुवून व लोट्या हातात घेऊन दूध काढायला जायचे. ते फेसाळलेले दूध घेऊन घरात आले की आई चहा करायची. त्या निरश्या दुधाचा फेस तरंगणाऱ्या चहाची चव अजून जिभेवर रेंगाळते.

आम्ही तिला नदीवर अंघोळीला नेली की सरळ नदीत जाऊन बसायची. मनसोक्त डुंबून झशले की आमच्या पुढे सरळ जाऊन गोठ्यात उभी राहिली.

ती दूधही भरपूर द्यायची. घरात पुरून उरलेल्य दुधाचे ठरावीक रतीब होते. ते घरी येऊन रतीब न्यायचे. आमच्या दुधात पाण्याचा थेंबही नसे. एकदम निर्भेळ! त्यामुळे दरवर्षी रतीब चालू ठेवण्यासाठी व नवीन सुरू करण्यासाठी लोकांची धावपळ असे. मात्र मोजके रतीबच आईला देता येत.

या निर्भेळ रतीबातही काही मजेशीर अनुभव आले.

शेजारच्या गावच्या एक बाई दोघा मुलांना शिक्षणासाठी बरोबर घेऊन आमच्या घराजवळ बिऱ्हाड करून राहिल्या होत्या. आम्ही नवीन म्हैस घेतल्याचे समजताच त्या आईकडे आल्या. ''काशीताई, तुमच्याकडेचे दूध चांगले असते. काही करा नी मला अच्छेर दूध रोज द्या. पैसे मी एक तारखेसच न चुकता देईन. नाही म्हणू नका.'' म्हणून सांगून गेल्या. दूध सुरू झाल्यावर आठ दिवसांनी परत आल्या व सांगू लागल्या, ''काशीताई, अगोदर पण अच्छेरच दूध घेत होते पण पुरवठ्यास येईना. म्हणून परवापासून तुमच्या दुधात पावशेर पाणी घालत्ये. पण दाटपणा कमी होत नाही आणि आता मुलांस्नी सकाळी अर्धा अर्धा कप प्यायला देत्ये नि रात्री उरलेल्या दुधात विरजण लावून दुपारी ताक पण होते.''

शिवरात्र होऊन उन्हाळा सुरू झाला की म्हशी आटतात. (म्हणजे दूध कमी द्यायला लागतात.) त्यावेळी त्या दूध न्यायला आल्या व आईला सांगू लागल्या, ''काशीताई, म्हैस आटली तर काही करा पण माझे दूध बंद करू नका हो! तुमच्या गोठ्यात म्हैस आहे तोवर मव माझे बिऱ्हाड आहे तोवर दूध बंद करू नको हो!' परिस्थिती बेताची असली तरी पैसे वेळेवर! आईनेही त्यांचे मुलगे पास होऊन बिऱ्हाड हालेपर्यंत त्यांचे दूध कमी करण्याचे किंवा बंद करण्याचे कधीही मनात आणले नाही.

वडिलांचा एक मामेभाऊ - जो आम्हाला माहीतही नव्हता - बऱ्याच वर्षांनी इथल्या पोष्टात तार मास्तर म्हणून बदलून आला. आमच्या शेजारीच त्याला बिऱ्हाड मिळाले. घरचा म्हणून इतरांच्या आधी त्याला दुधाचा रतीबही सुरू झशला. पण तो अतिशय हलक्या मनाचा व कशावर विश्वास न ठेवणारा नमुना होता. सुरुवातीला त्याने दुधाचे तोंड भरून कौतुक केले. नंतर थोड्याच दिवसात त्याच्या मनात संशयाचे भूत आले. दुधांत थोडे तरी पाणी असणार असे तो सुचवू लागला. नंतर वडिलांच्या दूध काढण्याच्या वेळेला येऊन बसू लागला व ते दूध काढायला उठले की हा पण मागोमाग गप्पा मारायला म्हणून त्यांच्या बाजूला जाऊन बसायचा. चरवीत पाणी नाही ना याचीही हळूच खात्री करायचा. दूध काढून होताच त्यांच्या मागोमाग येऊन चुलीपुढे बसायचा. वडील दूध ठेवून ओटीवर जाऊन बसायचे. आई पाणी घालील की काय या संशयाने तो तिच्यासमोर दूध लोटीत घेऊन बाहेर बसायचा व निरशा दुधाचा चहा ढोसून जायचा.

नंतर नंतर चहा होईपर्यंत तो आईबरोबर पचापचा करीत बसायचा. वडिलांचाही कप बरोबर घेऊन चहा प्यायला ओटीवर यायचा. आईला त्याची ख्याती माहिती होती. आपल्या नोकरीच्या अशाच एका ठिकाणी हा आपल्या गुरखा लाईनमनला लाईनवर पाठवायचा आणि त्याच्यास सुंदर बायकोशी चाळे करायला जायचा. तिने नवऱ्याला सांगितल्यावर त्याने लाईनवर न जाता याला पकडला व लोखंडी शीग त्याच्या डोक्यात हाणली. त्याची खूण तो कायम मिरवीत होता.

एक दिवस आईने त्याला चांगले सुनावले, ''तुमचे भाऊ ओटीवर बसलेले असतान तुमचे इथे चुलीपुढे काम काय? तुम्ही त्यांच्याबरोबर बाहेर जाऊन बसा. मी तुम्हाला दूध आणि चहा बरोबर आणून देईन. इथे तुमचे काम नाही.'' हे ऐकल्यावर वरमून तो बाहेर जाऊन बसू लागला; पण लवकरच आम्हाला बाहेर दूध मिळायला लागल्यापासून दूधात बदल झाला असे टुमणे वडिलांजवळ लावले. वडिलांनी त्याला एक

तारखेपासून बंद कर म्हणून सांगितल्यावर थोडे दिवस गप्प राहिला. मात्र थोड्याच दिवसांनी आईसमोर येऊन त्याने हेच ऐकवायला सुरुवात केली. आईने ताडकन एक तारखेपासून दुसरीकडे बघा म्हणून सुनावले व खरोखरच एक तारखेला रिकामा लोटा घेऊन पाठवले.

आठ-दहा दिवसांतच आमची काकू गयावया करीत आली. ''अगो, तू त्यांचे काही मनावर घेऊ नकोस. उद्यापासून दूध परत चालू कर. मी स्वत: न्यायला येत जाईन. तुमच्या दुधावर लोणीसुद्धा चांगलं येतं व तूप महिनाभर पुरतं.'' असे सांगू लागली. पण आईने ''कोणाचा रतीब सुटतो याची इथे लोक वाट बघत असतात. एक तारखेपासून दुसरे नेतात. त्याचे आता बंद करता येणार नाही.'' असे सांगून तिला परतवली व काका तिथे असेपर्यंत हात चोळीत व काकूच्या शिव्या खात पाणीदार दूधावर राहिला.

योगायोग असा की काका बदली होऊन गेला व त्या जागेतच बदलून आलेले कोर्टातले नाझर राहिले. दूधही आमच्याकडेच सुरू झाले. दोन दिवसात नाझरीणबाईंचा निरापे आला, ''दूध घरी पोहोचवीत जा.'' आईने लगेच उत्तर पाठविले, ''हा आमचा धंदा नव्हे. माझ्याकडे माणूस नाही. गैरसोय होत असेल तर उद्यापासून दूध नेऊ नका.'' लगेच नोकर येऊन दूध नेऊ लागला.

मग एक दिवस रस्त्यात भेटल्या तर तावातावने सांगू लागल्या, ''ताई, हल्ली दूध चांगलं नसतं. सुरुवातीसारखंच घाला.'' त्यावर आईने ''चांगलं नसतं म्हणजे कसं असतं? आणखी कोणाची तक्रार नाही. एक तारखेपासून नको का?'' असे विचारले. यावर चपापून ''एकदम इतक्या पुढे जाऊ नका. सहज कानावर घातलं.'' म्हणून पुढे निघून गेल्या. मग काही दिवसांनी पुन्हा तक्रार आली, ''अहो, तुम्ही दुधात आरारूट का काय घालता ते कमी घाला. दूध जमिनीवर सांडलं तर जमीन पाणी ओढून घेते व पावडर वर राहते.'' आईने एक तारखेपासून दूध बंद करून टाकले.

महिना पुरा व्हायच्या आत एक दिवस नाझरसाहेब अकल्पितपणे वडिलांना भेटायला आले. असेल शाळेचे काही काम म्हणून वडिलांनी स्वागत करून विचारपूस केली. नाझरसाहेबांनी सुरुवात केली, ''मास्तरसाहेब, या बायकांना काही कळत नाही. त्यांना फक्त नवऱ्याच्या नावावर मिजास मारायची माहिती असतं. अहो, तुमच दूध बंद झालं नि आमची पंचाईत झाली. घरात तूप बंद झां. दीड शेर दूध घेऊनही पुरवठ्याला येत नाही. आणि तुमच्याकडचं एक शेरातलं अर्धाकप रात्री प्यायला मिळायचं. काही करा नि एक तारखेपासून दूध पुन्हा चालू करा म्हणून विनंती करायला आलो आहे.'' एवढा मोठा माणूस घरी विनंती करायला येतो वडील अवाकूच झाले. तेवढ्यात निरशा दुधाचा चहा पुढ्यात आला. नाझरसाहेबांनी घुटक्या घुटक्याने चहा चवीने घेत विचारले, ''मास्तरसाहेब, पावडर कुठली वापरता? असा चहा आज प्रथमच प्याला.'' वडील म्हणाले, ''पावडर नेहमीचीच, पण हा आत्ता काढलेल्या निरशा दुधाचा आहे. एवढाच फरक.'' हे ऐकून नाझरसाहेब म्हणाले, ''असं होय! आता तुमच्याकडचं दूध सुरू झालं की संध्याकाळी कोर्टातून आल्यावर बायकोला असाच चहा करायला सांगेन. पण मास्तर, सहज विचारतो, एवढं सकस नि निर्भेळ दूद या भावात द्यायला परवडतं कसं?''

वडिलांनी त्यांना सांगितलं, ''मी लहानपणापासून गायी-म्हशीच्या दुधावर वाढलो. मधला शिक्षणाचा काळ खडतर गेला. नोकरी लागल्यावर घरी म्हैस आणण्याचा विचार पक्का केला. पण परवडेल किंवा नाही हा विचार प्रश्नचिन्ह निर्माण करी. मग माझ्यासारख्याच एक दोघांना विचारलं. त्यांनी सांगितले,''म्हैस चांगली दुधाळ खात्रीची घ्यायची. तिला पेंड,सरकी, भूशी (कोंडा) घालायचा म्हणजे दूध सकस येईल. घरापुरते ठेवून वरचे रतीब द्यायचे. विक्रीतून म्हशीचा सगळा खर्च वाटवेल व घरात उत्तम दूध फुकटात पडेल. फक्त त्यासाठी मेहनत करावी लागेल. जनावरोच सर्व वेळच्या वेळी करावे लागते. वेळ असेल तर शेणाच्या गोवऱ्या व शेणीपासून जळण मिळते ते वेगळेच. तूप उरले तर त्यालाही भाव मिळेल. म्हशीचा खर्च भागून मेहनतीचा मोबदला मिळेल. बायकोही तयार झाली व सर्व त्रैराशिक नशिबाने उत्तम जुळले.'' असं म्हणून वडिलांनी समोरच बाकावर रचलेली पोती दाखवली. ''दुधात पाणी थेंबही घालायचे नाही व पापाचा एक पैसाही घरात आणायचा नाही हे व्रत! मिळाला तर दुवा घ्यायचा. तो केव्हा ना केव्हा उपयोगी येईल.''

नाझरसाहेबांनी वडिलांचा हात हातात घेतला व त्यांच्या नजरेला नजर देऊन ते निघून गेले.

एक तारखेला स्वत: नाझरसाहेब दूध न्यायला आले. एवढा मोठा माणूस घरी विनंती करायला आला, त्यांचा अवमान करणे वडिलांना रुचणारे नव्हते. दूध पुन्हा सुरू झाले. पण त्यांनी स्वत: येणे वडिलांना रुचणारे नव्हते म्हणून ते आमच्यापैकी कोणाला (खास सवलत!) दूध घेऊन घरी पाठवू लागला. नाझरीणबाई असल्या की घुश्श्यातच दूध घेत व लोटी परत करीत. (मात्र आमच्या समोरच त्या लोटीत थोडे पाणी घालून विसळून ते दुधाळ आपल्या दुधात मिसळीत.) साहेब असले की न चुकता आमच्या हातावर काही ना काही देत.

त्यांची बदली होईतो विनातक्रार हे नंतर चालू राहिले. जाण्याच्या आदल्या दिवशी ते पुन्हा वडिलांना भेटण्यासाठी आले व म्हणाले, ''मास्तरसाहेब, कुठेही गेलो तरी तुमच्या सकस, निर्भेळ व निरशा दुधाच्या चहाची आठवण विसरणार नाही.'' आमच्याकडचा निरशा दुधाचा शेवटचा चहा पिऊन व पुन्हा वडिलांचा हात हातात घेऊन नाझरसाहेब निरोप घेऊन निघून गेले.

**- कै. विनायक दत्तात्रेय मराठे**
'मृगधारा', ४०८ यशवंत नगर,
तळेगाव दाभाडे, जि. पुणे ४१०५०७

## व्रतबंध

सौ. मानसी व श्री. आशिष विजय मराठे यांचे चिरंजीव पार्थ याचा उपनयन संस्कार शनिवार दिनांक २१ मे २०११ ला सकाळी ९ वाजून ४३ मिनिटांच्या शुभमुहूर्तावर प्रतिज्ञा हॉल, पुणे येथे थाटामाटात संपन्न झाला.

मराठे प्रतिष्ठानद्वारा बटू चि. पार्थला अनेकोत्तम शुभाशिर्वाद!

# कर्मयोग एक विचार

**डॉ. चिंतामणी मराठे**

गीतेमधील तिसरा अध्याय 'कर्मयोग' हा प्रत्येकास उपयुक्त, आचरण्यायोग्य असून मोठमोठ्या तत्त्वज्ञानी लोकांनाही मोहीत करणारा आहे. (विवेकानंद/लो. टिळक) आपणही या अध्यायात थोडेसे डोकावू या.

अर्जुन भगवंताला विचारतो, ''जर कर्मापेक्षा बुद्धी श्रेष्ठ आहे तर हे केशवा! हे घोर अनुचित कर्म करायला मला का बरे भाग पाडत आहेस? आणि मला मोहात का बरे जखडून टाकत आहेस? त्यापरता, ज्याने माझे कल्याणच होईल असा निश्चित मार्ग मला दाखव. ''त्यावर भगवंत सांगतात की, ज्ञानयोग व कर्मयोग या दोन्ही चांगल्याच निष्ठा आहेत. अंतिम ध्येयापर्यंत पोहोचण्याचे हे वेगवेगळे मार्ग आहेत. एकूण अंतिम ध्येयापर्यंत पोहोचण्याचे चार मार्ग आहेत.''

१. कर्मयोग २.भक्तिमार्ग ३. योग मार्ग आणि ४. ज्ञानमार्ग. हे चारही मार्ग एकमेकांपासून भिन्न नाहीत. त्यांचा परस्परांमध्ये समावेश असतोच. सामान्यत: मनुष्यात आढळणाऱ्या विशिष्ट प्रवृत्तीच्या अनुरोधानेच या चारही मार्गाची कल्पना केलेली आहे. आणि अंती हे चारही मार्ग मनुष्याला एकाच लक्ष्याप्रत नेऊन पोहोचवतात. ते लक्ष्य म्हणजेच मुक्ती.

जगातील प्रत्येक मनुष्य काही ना काही कर्म करत असतोच. कर्माशिवाय कोणीही क्षणभरही राहू शकत नाही. सर्व प्राणिमा प्रवृत्तीच्या गुणांनी बांधलेले असतात. ते गुण त्यांच्याकडून कर्म करवून घेतात. कर्मेंद्रियांना बंधनात ठेवून फक्त विषयाचे चिंतन करणारे मूढजन हे ढोंगी होत. परंतु इंद्रियांना योग्य प्रकारे ताब्यात ठेवून कोणतीही आसक्ती न ठेवता कर्मेंद्रियाद्वारा कामाचा उरक पाडणारा तो खरा कर्मयोगी होय. त्याची योग्यता विशेष असते. त्यामुळेच भगवंत अर्जुनाला उपदेश करतात की, ''हे अर्जुना, तू तुझे नेमलेले कर्म कर. कर्म न करण्यापेक्षा, कर्म करणे हे श्रेष्ठ आहे. कर्माशिवाय तुझे जीवन व्यर्थ आहे. नदीच्या एका तीरावरून दुसऱ्या तीरावर जायचे असेल तर नावेत बसून किंवा पोहून जाता येईल. या दोन्हीमधले कुठलेच कर्म केले नाही तर पैलतीर कसा गाठता येईल? जेवण हवे असेल तर अन्न शिजवण्याचे काम केल्यावाचून जेवणाची तृप्ती कशी मिळेल?''

कर्म हे सुटता सुटत नाही. याबद्दल कुठल्याही संदेह मनात ठेवू नये. मी अमूक एक कर्म सोडीन असे म्हणणे हे अज्ञानाचे लक्षण आहे. प्रकृतीच्या त्रिगुणावर कर्म बांधलेले असते. स्वाभाविक कर्मे ही इंद्रियाधीन असतात. ती थांबवू म्हटले तरी थांबवता येत नाहीत. ऐकणे, पाहणे, श्वास, गंध घेणे, तहान, भूक निद्रा, चालणे आणि तसेच जन्म व मृत्यू, कर्मत्याग करतो म्हटल्याने ह्या गोष्टी थांबत नाहीत, कारण त्या मायेशी जोडलेल्या आहेत.

यासाठीच भगवंत 'निष्काम कर्म' करावयास सांगतात. निष्काम कर्म, म्हणजे परमेश्वरावर अढळ श्रद्धा ठेवून इंद्रियांना काबूत ठेवून, फलाची अपेक्षा न ठेवता कर्म करणे. काम-मोहविरहित रीतीने कर्म करणारा, इतरांसारखाच बाह्यत: दिसता. परंतु तो आसक्तीरहीत असतो आणि म्हणूनच तो 'योगी' किंवा 'मुक्तात्मा' होय. स्वकर्म उत्तमप्रकारे करावे. शास्त्रबाह्य वर्तन करू नये. त्याचबरोबर केलेल्या कर्माच्या फलाची आशा न ठेवता त्याला ईश्वराची इच्छा म्हणून मानावे. यामुळे मोक्षपदाचा आनंद लाभेल.

'स्वधर्म' पालन करणे हाच यज्ञ होय. 'स्वधर्माविषयी भगवंत सांगतात -''ब्रह्मदेवाने सृष्टी निर्माण केली त्यात स्वधर्माचा यज्ञ योजला. तेव्हा प्रजा म्हणाली की देवा, हे कशाच्या आधारे सांगता आहात? त्यावर ब्रह्मदेव वदले की, 'स्वधर्माची उपासना करा, त्याने सगळ्या इच्छा पुऱ्या होतील. व्रतवैकल्ये, तीर्थाटन, योगसाधना, दैवत-पूजा-अर्चा-उपासना, तंत्र-मंत्र या कशाचीही गरज नाही. मात्र पतिव्रता जशी निष्ठेने पतिसेवा करते, तशा निष्ठेने, निष्काम होऊन 'स्वधर्म' व 'स्वकर्म' पार पाडा. स्वधर्मपालन तुमच्यासाठी कामधेनू बनेल. तुमचे कायमस्वरूपी रक्षण, भरण-पोषण होईल. सर्व देवता तुमच्या इच्छा पूर्ण करतील. तुम्ही सर्व कर्मे करून प्रेमाने ती इष्ट देवतांस अर्पण कराल तर तोच तुमचा योगक्षेम चालवतील. तुम्ही म्हणाल ते सिद्ध होईल. वाचा सिद्धी प्राप्त होईल आणि सर्व सुखे, भाग्य तुमचा शोध घेत तुमच्या पायाशी येतील. या ऐहिक उपभोगाचा उपयोग जो इष्ट देवतांसाठी करणार नाही. स्वधर्माचरण सोडून देईल, त्याला हे ऐश्वर्य सोडून देईल.''

म्हणून ब्रह्मदेव पुन्हा सांगतात की जो स्वधर्माचा त्याग करेल तो आपोआप पापगर्तेत ओढला जाईल. तो त्यातून मुक्त होऊन अंतिम सत्यापर्यंत पोहोचणार नाही. म्हणून स्वधर्म जाणून उचित स्वकर्म करण्यास तत्पर असावे, स्वधर्माचरणाने आप्त झालेले ऐश्वर्य, स्वधर्मानुसारच खर्चावे आणि जे उरेल त्याचा स्वत: भोग घ्यावा. सर्व गोष्टी म्हणजे यज्ञ-साहित्य आहे हे लक्षात घेऊन त्याचा यथायोग्य रीतीने चांगला उपयोग केला पाहिजे. या विश्वात सर्व प्राण्याचे 'अन्न' हे जीवनाधार आहे. अन्नाची उत्पत्ती पर्जन्यामुळे होते, पर्जन्याची उत्पत्ती यज्ञामुळे होते. आणि यज्ञाची उत्पत्ती कर्मापासून होते. हे सृष्टिचक्र अव्याहत चालत आले आहे व चालत राहील. परमेश्वराने निर्माण केलेले हे चक्र तसेच चालू ठेवणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.

स्वधर्माचे पालन करताना उचित रीतीने स्वकर्म करून अंतिम ध्येयावत पोहोचणे हे अतिशय कठीण आहे. कारण ह्या मार्गावर 'काम' व 'क्रोध' हे दोन राक्षस आडवे येतात. हे इंद्रियांवर ताबा मिळवून, त्यांना उचित कर्म करण्याला विरोध करतात, उलट त्यांच्याकडून अनुचित कर्म घडवून आणण्यासाठी प्रवृत्त करतात. आणि आसक्तीच्या वेढ्यात अडकवून फलाशेमध्ये गुंतवून टाकतात. त्यामुळे अंतिम ध्येयप्राप्ती होत नाही. यावर उपाय म्हणजे अंतरात सोहम

भाव जागृत व्हायला हवा. मनाला काबूत ठेवून, ईश्वराचे अखंड स्मरण करत विहित कर्म योग्य रितीने पार पाडता आले पाहिजे. त्यामुळे काम-क्रोधरूपी राक्षसांना थारा मिळणार नाही. आणि मनुष्याची कर्मयोगी पदाकडे वाटचाल सुरू होईल. यात क्षेम, आस्था व निष्कामसेवा यांचा संयोग व्हायला हवा.

स्वामी विवेकानंदांनी म्हटले आहे की, नि:स्वार्थ कर्माचरणाने अंतिम ध्येयाचा - मुक्तीचा लाभ करून घेणे हाच कर्मयोग होय. प्रत्येक स्वार्थमूलक कर्म, त्या परम अवस्थेप्रत पोहोचण्याच्या मार्गात विरोध करणारे ठरते. नि:स्वार्थ कर्म आपल्यला ध्येयात घेऊन जाईल. म्हणून नीतीची एकच व्याख्या करता येईल - जे स्वार्थी आहे ते नीतिविरुद्ध आहे व जे नि:स्वार्थी आहे ते नीतिसंगत आहे आणि तेच ईश्वराला अभिप्रेत आहे. म्हणूनच नि:स्वार्थपरता व सत्कर्म यांच्याद्वारा मुक्तीलाभ करून घेण्याची एक विशिष्ट नैतिक व धार्मिक प्रणाली म्हणजे कर्मयोग. स्वामी पुढे म्हणतात - कर्म कसे करायचे हे शिकण्याची काय गरज? कर्म सर्वजण करत असतात. पण कर्म करताना शक्ती आणि वेळेचा अपव्यय म्हणजे ईश्वराच्या संपत्तीचाा अयोग्य वापर होय. म्हणून 'योग कर्मसु कौशलम' कर्माचरणातील कौशल्य म्हणजे कर्मयोग. शास्त्रीय पद्धतीने कर्मानुष्ठान उत्तम प्रकारे करायचे आणि ते ईश्वरचरणी अर्पण करायचे. शरीर व मन यामध्ये वसत असलेली शक्ती प्रकट करणे हा सर्व कर्मांचा उद्देश. या शक्तीला जागे करण्यासाठीच कर्म आवश्यक आहेत. म्हणूनच कर्माचरण हीच कमयोग्याची साधना.

**- डॉ. चिंतामणी मराठे**

### नांदा सौख्यभरे

डॉ. सौ. ललिता व श्री. रमेश भिकाजी मराठे यांचे ज्येष्ठ चिरंजीव राजीव यांचा शुभविवाह चि. सौ. कां. रेश्मा माधव रेमणे हीजबरोबर दिनांक १४ मे २०११ला सकाळी १० वाजून १४ मिनिटांनी लोकमान्य सभागृह, पुणे येथे थाटामाटात संपन्न झाला.

मराठे प्रतिष्ठानद्वारा नवविवाहितांना हार्दिक शुभेच्छा!

### नांदा सौख्यभरे

सौ. विभा व श्री. संजय केशव खांबेटे यांचे सुपुत्र चि. अमेय यांचा शुभविवाह चि. सौ. कां. रूपाली रमेश चिखले हीजबरोबर सोमवार दिनांक २३ मे २०११ला सकाळी १० वाजून ४०मिनिटांनी शुभंकरोति कार्यालय, ठाणे येथे थाटामाटात संपन्न झाला.

मराठे प्रतिष्ठानद्वारा वधू-वरांना हार्दिक शुभेच्छा!

### व्रतबंध

सौ. रमा व श्री. यशवंत सीताराम मराठे यांचे चिरंजीव शंकर व वरुण या दोघांच्या मुंजी सोमवार दिनांक ७ मे २०११ला सकाळी १० वाजून ६ मिनिटांच्या शुभमुहूर्तावर श्री. सीताराम य. मराठे यांच्या निवासस्थानी (बिंबल, सत्तरी-गोवा) येथे थाटामाटात संपन्न झाल्या.

चि. शंकर आणि चि. वरुण या दोन्ही बटूंना मराठे प्रतिष्ठानद्वारा अनेकोत्तम शुभाशिर्वाद!

श्री. रा. रा. चितळे (सौ. रेखा चितळे मराठ्यांची माहेरवाशीण), रत्नागिरी, श्री. वासुदेव मराठे, कार्कल, कर्नाटक, श्रीकांत नारायण मराठे, ठाणे. या कुलबांधवांचे देणगी दिल्याबद्दल धन्यवाद! मराठे प्रतिष्ठानद्वारा आभार!

## सहवेदना



श्री. विष्णू विश्वनाथ जोशी (जन्म : २२-९-१९३३ व मृत्यू : १३-५-२०१०) हे इम्प्रेस मील नागपूर येथे कार्यरत होते. त्यांनी मराठे कृलवृत्तांत संदर्भात नागपूर येथील कुलबांधवांची माहिति संकलनाचे कार्य हिरीरीने केले. प्रत्येक मराठे बांधवांच्या संमेलनात ते आर्वजून उपस्थित राहत.

त्यांच्यामागे पत्नी, मुलगा, सून, मुलगी, जावई व नातवंडे इत्यादी परिवार आहे.

मराठे प्रतिष्ठानद्वारा श्री. विष्णू विश्वनाथ जोशी यांना हार्दिक श्रद्धांजली!

# बरे झाले

बरे झाले वाल्याबाई दिलास नकार
पापामध्ये नाही झालीस भागीदार ॥धृ॥

वाल्यांचे भरले सात रांजण
एक खडा टाकी एक मरे ब्राह्मण
पापाचे ऐसे त्याने रचले डोंगर ॥१॥

भाग्य त्याचे मोठे नारद गुरू भेटे
नाम जपू लागले उलटे उलटे
उलट्या नामाने झाला त्याचा उद्धार ॥२॥

मरा मरा मरा म्हणे तीन वेळा
राम राम होई दोन वेळा
नामाचा महिमा अपार-अपार ॥३॥

रामनाम जपता वाढले वारूळ
जपयज्ञ त्याचा जाहला सफळ
वाल्यातून वाल्मिकी जाहला अमर ॥४॥

श्लोक पाहिला 'मा निषद!'
श्रीरामायण जाहले प्रसिद्ध
निर्गुण राम त्याने केला साकार ॥५॥

आधी लिहिले रामायण
नंतर घडले रामायण
उलट्या नामाचा उलटा प्रकार ॥६॥

**नेवैद्य काव्यसंग्रहातून**

**-श्रीमती प्रतिभा सुधाकर मराठे, (पृ.१२९)**
४०३, मनसुबा सहनिवास, घंटाळी, राम गणेश गडकरी मार्ग, नौपाडा,
ठाणे (प.) -४०० ६०२ फोन : ०२२-२५४२०७७१

## वाचकांचा पत्रव्यवहार

हितगुजचा मार्च ११चा अंक पोहोचला. हा अंक सर्वतोपरी उत्तम झाला आहे. लेख, विषयांची विविधता आणि वाचनीयता उल्लेखनीय आहे. असे स्वरूप जर 'हितगुज'ला मिळाले तर त्याचे रूपांतर मासिकात होईलच! तसे सूतोवाच 'कुलवृत्तांत : बदलते संदर्भ' या लेखात झालेच आहे. कुलबंधूंना लेखनाचे आवाहन करून चांगले साहित्य उपलब्ध होईल. मला स्वत:ला 'हितगुज' हे उत्तम व्यासपीठ तुम्ही दिले आहेच. यापुढे ते अनेकांना मिळो.

ओन्ली या शब्दाचा विविधस्थानी उपयोग करून एकाच वाक्याच्या आठ अर्थच्छटा निर्माण होतात. हे वाक्य मी ३० वर्षांपूर्वी वाचले होते. त्यावरून मी केलेले मराठी वाक्य मी ३० वर्षांपूर्वी वाचले होते. त्यावरून मी केलेले मराठी वाक्य असे 'गेल्या रविवारी आम्ही एका रेस्टॉरंटमध्ये जेवण घेतले.' प्रत्येक शब्दापूर्वी 'फक्त' हा शब्द वापरून सात वेगळे अर्थ होतात.

अंकाच्या या संपादनाबद्दल तुमचे अभिनंदन. आणि अधिक प्रगतीसाठी अनंत शुभेच्छा!

**- श्री. अ. द. मराठे,**
६ मंजूषा, विकास हाउसिंग सोसायटी, शास्त्रीनगर, डोंबिवली (प) -४२१ २०२
दूरध्वनी : ०२५१-२४९९८४२/ ९८५०२४१९१३

जेवावे लागत होते. एक दिवस तर असा आला की टपरीच्या पोऱ्याला बोलावून घरातील पेपरची रद्दी विकून रात्रीच्या जेवणाचे पैसे जमवावे लागले... गेले ते दिवस..

अंगणात जिथे खूप खूप फळझाडं होती, त्यातली थोडीशी झाडं छाटून आमचे स्वतःचे घर नवीन गरजांप्रमाणे आम्ही बांधले. कन्स्ट्रक्शनच्या कामाबरोबर आता आमची एक दगडांच्या प्रोसेसिंगची फॅक्टरीदेखील आहे. चंद्रपूर जिल्ह्यामध्ये दगडाची खाण आहे. त्या खाणीतले आणि विदर्भातील इतर खाणीतले दगड आम्ही आमच्या फॅक्टरीमध्ये कापतो आणि बिल्डिंग इंडस्ट्रीला देतो. अशा प्रकारचे हे युनिट या भागात एकमेव आहे. बगीच्यात लागणारे दगडाचे फर्निचरदेखील आम्ही बनवतो. काहीतरी नवीन आणि इनोशिएटिव्ह करण्याचा खूप आनंद मिळतो.

शिरीषचा भाऊ शशांक चक्रदेव आर्किटेक्ट आहे. गोंदियाला एच.ओ.डी. आहे. एक बहीण सौ. साधना माटे डेंटिस्ट आहे, दिल्लीला असते. दुसरी बहीण स्मिता बापट पुण्याला असते, तिचे यजमान इंडियन एअरफोर्समध्ये ग्रुप कॅप्टन आहेत.

मी 'उज्ज्वला' आर्किटेक्ट आहे. माहेरची जोशी. १९८४ साली मी शिरीषशी विवाहबद्ध झाले. मी आणि शिरीषने इंटेरिअर डिझायनिंगची खूप कामं एकत्र केली आहेत. माझं डिझायनिंग व त्यांचं एक्झिक्युशन. मी नागपूरच्या नामंकित आर्किटेक्चर कॉलेजमध्ये प्राचार्या आहे.

चैतन्य आणि सुनीत ही आमची मुलं. चैतन्य सध्या २४ वर्षांचा आहे. तो मेकॅनिकल इंजिनिअर आहे. त्याला लहानपणापासूनच आर्मीमध्ये जायचं होतं. धडाडी आणि ॲडव्हेंचर त्याला खूप आवडतं. त्याप्रमाणे तो घडत गेला. ११वी आणि १२वी त्याने औरंगाबादच्या Services Preparatory Institute-SPI मधून केलं. या संस्थेमध्ये मुलांना डिफेन्स सर्व्हिसमध्ये प्रवेश घेण्याचं प्रशिक्षण दिलं जातं. १२वीच्या इतर मुलांप्रमाणे खूप अभ्यासाला जुंपून घेणं इथल्या मुलांना जमत नाही. इतर अनेक गोष्टी शिकण्यामध्ये त्यांचा वेळ जातो. त्याची पर्सनॅलिटी तिथे घडली. आज तो इंडियन आर्मीमध्ये कॅप्टन आहे.ल

चि. सुनीत सध्या बिट्स पिलानीहून (B.E. on-Civil Engg.) आणि M.Sc. Bio Technology करतोय. तो दुसऱ्या वर्षाला आहे. आपापल्या क्षेत्रात आम्हा सगळ्यांना हवी तशी प्रगती करता आली कारण आमच्या सासूबाई आमच्यासोबत नेहमी होत्या आणि आहेत. मुलांना वाढविण्याची आमची जबाबदारी आणि घराला घरपण देण्याची जबाबदारी त्यांनी आमच्याबरोबर शेअर केली. अशी ही आमची छोटीशी गोष्ट.

**- डॉ. सौ. उज्वला शिरीष चक्रदेव,**

सॅन स्टोन, टिकेकर रोड, धंतोली, नागपूर - ४४० ०१२ दूरध्वनी - २४४२६४८

# प्रत्येकाचं स्वप्न, प्रत्येकाचं घर



घरातल्या प्रत्येकाच्या स्वप्नांचा आम्ही विचार करतो.
म्हणूनच आम्ही प्रत्येक गृहरचनेत मोकळेपणा, उत्कृष्ट जीवनशैली आणि आधुनिक सुखसुविधांचा समावेश करतो. हे घर तुम्हांला सहजतेने घेता यावं यासाठी वाजवी दरही देतो.
हेच तर आहे निर्माण. तुमच्या स्वप्नांचे आणि सुंदर गृहरचनांचे !

विश्वसनीय परंपरा आणि पारदर्शक व्यवहार

निर्माण ग्रुप ऑफ कंपनीज्
बिल्डर ॲंड डेव्हलपर्स

## आमचे आधुनिक जीवनशैलीचे प्रकल्प

मुंबईतील प्रकल्प स्थाने : महालक्ष्मी | जोगेश्वरी | मालाड (आझाद) | कांदिवली (पूर्व) आणि (पश्चिम) | गोवंडी | जोगेश्वरी

मुंबई बाहेरील प्रकल्प स्थाने : नेरळ | गोरेगाव आणि माणगाव | गणपतीपुळे

imep109/09

Project marketed by
DREAMZ
(A NIRMAN Group Enterprise)

हेड ऑफिस : 14, न्यायसागर, चिनॉय कॉलेज जवळ, जुना नागरदास रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई - 400069
फोन : 91 9987686847 / 48 / 49 | SMS <DREAMZ> 567678


**BOOK POST**

**If undelivered, please return to**

**संपादिका : 'हितगुज'**
८/१३, सहकार नगर,
वडाळा,
मुंबई - ४०० ०३१

**मराठे परिवाराला नवीन वर्ष सुखसमृद्धीचे व समाधानाचे, उत्तम आरोग्याचे आणि भरभराटीचे जावो, ह्या शुभेच्छा!**


त्रैमासिक 'हितगुज' हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०००२५ या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.
पत्रव्यवहाराचा पत्ता : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई-३१. दूरध्वनी : २४१५०८८९ ई-मेल: prabhakar_marathe@yahoo.com
ई-मेल : (१) sitaram_khambete@yahoo.com (२) maratheparivar@yahoo.co.in ⦿ वेबसाईट : www.marathepratishthan.org